
दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०६६ • पुणे • गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



जमीन प्रकरणात ४०० कोटींचा महाघोटाळा?

3



'आधी स्त्रीचा सन्मान करायला शिका!'

4



पंतप्रधान मोदींचे ८१ देशांचे १८३ दौरे

सरकारी तिजोरीतून ९०० कोटींचा खर्च! | संसदेत परराष्ट्र मंत्रालयाची माहिती; अमेरिकेला सर्वाधिक १० वेळा भेट

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांवर झालेल्या खर्चाचा तपशील संसदेत सादर करण्यात आला असून, जून २०१४ ते जुलै २०२६ या कालावधीत त्यांनी ८१ देशांचे एकूण १८३ दौरे केल्याची माहिती समोर आली आहे. या दौऱ्यांसाठी सरकारी तिजोरीतून ९०० कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने ही आकडेवारी संसदेत दिली आहे. पंतप्रधान मोदी नुकतेच दोन दिवसांच्या फिलिपिन्स दौऱ्यावरून १८ नोव्हेंबर रोजी मायदेशी परतले. या दौऱ्यात त्यांनी आसियान (ASEAN) आणि क्वाड (QUAD) शिखर परिषदांमध्ये सहभाग घेतला. तसेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. या पार्श्वभूमीवर त्यांच्या परदेश दौऱ्यांवरील खर्चाची माहिती चर्चेत आली आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, पंतप्रधान मोदी यांनी आपल्या कार्यकाळात अमेरिकेला सर्वाधिक १० वेळा भेट दिली आहे. त्यानंतर संयुक्त अरब अमिराती (UAE), जपान आणि फ्रान्स या देशांना प्रत्येकी आठ वेळा भेट दिली आहे. २०१९ मधील अमेरिका दौऱ्यांपैकी एका दौऱ्यावर सुमारे ३७.७ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती देण्यात आली आहे. याच दौऱ्यात ह्युस्टन येथे आयोजित 'हाउडी मोदी' कार्यक्रमाला सुमारे ५० हजार लोक उपस्थित होते.

२०१५ मध्ये सर्वाधिक परदेश दौरे

पंतप्रधान मोदी यांनी २०१५ मध्ये सर्वाधिक २८ परदेश दौरे केले होते. या दौऱ्यांमध्ये अमेरिका, ब्रिटन आणि चीनसह अनेक देशांचा समावेश होता. याच वर्षी त्यांनी पाकिस्तानमधील लाहोर येथे अनियोजित भेट देऊन तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांची भेट घेतली होती.

दरम्यान, २०२५ मध्ये मोदी यांनी २३ देशांचे दौरे केले. या दौऱ्यांवर किमान १८७.८ कोटी रुपये खर्च झाल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. २०१५ मधील ९१.५ कोटी रुपयांच्या खर्चाच्या तुलनेत हा खर्च लक्षणीयरीत्या अधिक आहे. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मे २००४ ते मे २०१४ या दहा वर्षांच्या कार्यकाळात ९६ देशांचे दौरे केले होते. त्यांनी अमेरिकेला १० वेळा, रशियाला नऊ वेळा, तर जपान आणि जर्मनीला प्रत्येकी पाच वेळा भेट दिली होती.

मोदी यांच्या पहिल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात म्हणजेच मे २०१४ ते मे २०२४ या काळात १३३ परदेश दौरे झाल्याची माहिती देण्यात आली आहे. मनमोहन सिंग यांच्या परदेश दौऱ्यांवरील एकूण खर्चाचा तपशील उपलब्ध नसला, तरी त्यांच्या कार्यकाळात चार्टर्ड विमानांवर सुमारे ७९५ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, जुलै २०२६ नंतर पंतप्रधान मोदी यांनी आणखी तीन परदेश दौरे केले आहेत. मात्र, या दौऱ्यांवरील खर्चाचा तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे आगामी काळात या खर्चाची माहिती समोर आल्यानंतर परदेश दौऱ्यांवरील एकूण खर्चाचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.



ठळक बातम्या

जॅकी दादांचा नारा!

पुणे (आरंभ पर्व) : पर्यावरण संवर्धन आणि वृक्षलागवडीचा संदेश नेहमीच आपल्या खास शैलीत देणारे बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी आज पुणे महानगरपालिकेला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेत शहरातील विविध विकासकामे आणि पर्यावरणाशी संबंधित विषयांवर चर्चा केली. या भेटीनंतर जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते जंगली महाराज रस्त्यावरील ऐतिहासिक छत्रपती संभाजी महाराज उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले. आपल्या रोखठोक आणि मिश्किल 'भिडू' शैलीसाठी ओळखले जाणारे जॅकी श्रॉफ उद्यानात दाखल होताच उपस्थितांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. वृक्षारोपणादरम्यान त्यांनी केवळ औपचारिकता न पाळता, रोपाची मुळे व्यवस्थित रुजावीत आणि त्याला पुरेसे पाणी मिळावे यासाठी स्वतः बारकाईने लक्ष दिले. "रोप लावताना त्याच्या मुळांना धक्का लागू देऊ नका, त्याला व्यवस्थित पाणी द्या," अशा सूचना त्यांनी आपल्या नेहमीच्या आपुलकीच्या शैलीत उपस्थितांना आणि कर्मचाऱ्यांना दिल्या.

जुन्या वादातून सतरा वर्षीय मुलाचा खून

पुणे (आरंभ पर्व) : जुन्या भांडणाच्या रागातून चार अल्पवयीन मुलांनी एका १७ वर्षीय मुलावर कोयत्याने वार करून त्याचा खून केला. ही धक्कादायक घटना फुरसुंगी परिसरातील भेकराईनगर येथे मंगळवारी (ता. १७) रात्री साडेआठच्या सुमारास घडली. या प्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी चार अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. करण रवींद्र नागटिळक (वय-१७, रा. भेकराईनगर, फुरसुंगी) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. याबाबत त्याची बहीण सोनाली नागटिळक (वय-२२) यांनी फुरसुंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सासवड रेल्वे स्थानकाकडून संकेत विहारकडे जाणाऱ्या रस्त्यावर, रेल्वे रुळाजवळ करण हा थांबला होता. त्या वेळी जुन्या वादाच्या कारणावरून चार अल्पवयीन मुलांनी त्याला गाठले.

आजपासून पुन्हा माध्यमिक शाळेची घंटा वाजणार

पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळीच्या सुट्टीनंतर आज गुरुवारी, दि. १९ नोव्हेंबरपासून माध्यमिक शाळा पुन्हा सुरू होत आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शांत असलेले शाळांचे परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने पुन्हा गजबजणार आहेत. सुट्टीनंतर मित्र-मैत्रिणींना भेटण्यासोबतच शाळेतील दैनंदिन उपक्रमांना सुरुवात होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. दिवाळीच्या सुट्टीनंतर शैक्षणिक सत्रातील महत्त्वाचा टप्पा सुरू होत आहे. त्यामुळे उर्वरित अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्याचे आव्हान शिक्षकांसमोर राहणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना वाचन, लेखन, गणित किंवा अन्य विषयांमध्ये अडचणी आहेत, त्यांच्यावर विशेष लक्ष देऊन त्यांची उजळणी करून घेण्याची गरज आहे.



• दिवाळीची सुट्टी संपली

याचबरोबर आगामी पॅट परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची तयारी करून घेणेही महत्त्वाचे ठरणार आहे. आतापर्यंत झालेल्या अध्यापनाचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक पातळी तपासली जाणार आहे. दरम्यान, शाळा सुरू होत असताना विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांच्या लाभाची स्थितीही तपासण्याची आवश्यकता आहे.

शिंदे गटाचा सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद

शिवसेना पक्षचिन्ह प्रकरण : ठाकरे गटाकडून प्रतिवादाची तयारी

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

शिवसेनेतील सत्तासंघर्ष आणि आमदार अपात्रता प्रकरणात सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीला बुधवारी महत्त्वपूर्ण वळण मिळाले. एकनाथ शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ध्रुव मेहता यांनी आपला युक्तिवाद पूर्ण करताना, पक्षांतर्गत मतभेद म्हणजे पक्षांतर नव्हे आणि विधिमंडळ पक्षाच्या बैठकीला अनुपस्थित राहणे म्हणजे राजकीय पक्ष सोडणे नव्हे, अशी ठाम भूमिका मांडली.

शिंदे गटाने शिवसेनेची मूळ हिंदुत्ववादी विचारधारा कायम ठेवली, तर तत्कालीन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपसोबतची युती तोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत सरकार स्थापन करत मूळ विचारधारेपासून फारकत घेतली, असा दावा मेहता यांनी न्यायालयात केला. २१ जून २०२२ रोजी झालेल्या शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या बैठकीला एकनाथ शिंदे गटाचे आमदार अनुपस्थित होते. याच मुद्द्यावरून त्यांच्याविरोधात अपात्रतेच्या याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, केवळ बैठकीला अनुपस्थित राहिल्याने संबंधित आमदारांनी राजकीय पक्ष सोडला, असे म्हणता येणार नाही, असे मेहता यांनी स्पष्ट केले. घटनेच्या दहाव्या अनुसूचीतील तरतुदीनुसार आमदारांना अपात्र ठरवण्यासाठी त्यांनी स्वेच्छेने राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडल्याचे सिद्ध होणे आवश्यक आहे. बैठकीला गैरहजर राहणे हा अपात्रतेचा स्वतंत्र आधार होऊ शकत नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि भाजपने युती करून जनतेकडे मतांचा कौल मागितला होता. मात्र, निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपसोबतची युती तोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत सरकार स्थापन केले. हा जनतेने दिलेल्या जनादेशाचा अवमान असल्याचा दावा शिंदे गटाने केला. उद्धव ठाकरे यांचा हा निर्णय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारधारेशी विसंगत होता. त्यामुळे शिंदे गटातील आमदारांनी पक्ष सोडलेला नसून पक्षाची मूळ राजकीय भूमिका आणि विचारधारा कायम ठेवल्याचे मेहता यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.



उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार हे शिवसेनेचे होते की महाविकास आघाडीचे, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. त्यावर भाजपचा पाठिंबा असला तरी ते सरकार शिवसेनेचेच होते, असे मेहता यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून शिवसेनेचे सरकार पुढे सुरू ठेवले, असा दावाही त्यांनी केला.

कसबा परिसरातील स्मशानभूमी बनतेय मद्यपींचा अड्डा

पोलीस प्रशासनाच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष | उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांचा वाढता उपद्रव | परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण | पोलिसांनी तातडीने धडक कारवाई करण्याची मागणी

बारामती - केदार पाटोळे
(दै. आरंभ पर्व)


बारामती शहरातील कसबा परिसरातील स्मशानभूमी परिसरात उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. स्मशानभूमी परिसराचा वापर मद्यपानासाठी केला जात असल्याचे चित्र समोर येत असून, याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांकडून केला जात आहे.

स्मशानभूमी तसेच मधला रिंग रोड हा परिसर सतत वर्दळीचा आहे. मात्र, या ठिकाणी काही व्यक्ती वारंवार एकत्र जमून उघड्यावर मद्यपान करतात. त्यामुळे परिसरात अस्वच्छता निर्माण होण्याबरोबरच आजूबाजूच्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या मार्गावरून जाणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांनाही अशा प्रकारांमुळे असुरक्षित वाटत असल्याची भावना व्यक्त होत आहे.



विशेष म्हणजे, शहरात गुन्हेगारीच्या घटनांबाबत चिंता व्यक्त होत असताना सार्वजनिक ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणावर मद्यपान सुरू असेल, तर संबंधित व्यक्ती कोण आहेत, तेथे नेमके काय प्रकार घडतात आणि या ठिकाणी वारंवार गर्दी का होते, याची सखोल चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. स्मशानभूमीसारख्या पवित्र आणि संवेदनशील ठिकाणी अशा प्रकारचे गैरवर्तन होणे ही गंभीर बाब आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार या प्रकाराबाबत चिंता व्यक्त करूनही ठोस कारवाई होत नसल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पोलीस प्रशासनाने या परिसरात तातडीने गस्त वाढवावी, साध्या वेशातील पोलिसांमार्फत पाहणी करावी, उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांची ओळख पटवून कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. तसेच रात्रीच्या वेळी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवून या ठिकाणी नेमके काय सुरू आहे, याची सखोल चौकशी करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना सुरक्षितपणे वावरता आले पाहिजे. मग कसबा परिसरातील स्मशानभूमीच्या ठिकाणी सुरू असलेल्या या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन नेमके कोणते पाऊल उचलणार? नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पोलीस प्रशासन धडक कारवाई करणार का? याकडे आता कसबा परिसरातील रहिवाशांचे लक्ष लागले आहे.



बुवाबाजी हटाव!

श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धेचा बाजार; समाजाला विवेकाची गरज, ढोंगी बाबांच्या साम्राज्याला लगाम हवा!

समाजात श्रद्धेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रद्धा माणसाला मानसिक आधार देते, संकटाच्या काळात जगण्याचे बळ देते आणि जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा देते. मात्र, जेव्हा याच श्रद्धेचा गैरफायदा घेऊन काही तथाकथित बाबा, बुवा, महाराज आणि स्वयंघोषित धर्मगुरू सामान्य माणसांची आर्थिक, मानसिक आणि शारीरिक पिळवणूक करू लागतात, तेव्हा हा विषय केवळ धार्मिक राहत नाही, तर सामाजिक चिंतेचा आणि कायदा-सुव्यवस्थेचा बनतो. म्हणूनच आज समाजाला एका ठाम भूमिकेची गरज आहे, ती म्हणजे 'बुवाबाजी हटाव, अंधश्रद्धा मिटव आणि विवेकवाद रुजव!'

आजच्या आधुनिक युगात विज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. माणूस चंद्रावर पोहोचला, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून नवनवीन शोध घेत आहे, वैद्यकीय क्षेत्रात असाध्य मानल्या जाणाऱ्या आजारांवर उपचार उपलब्ध होत आहेत. मात्र, दुसरीकडे समाजातील काही घटक अजूनही चमत्कार, गंडेदोरे, ताईत, करणी, भानामती, ग्रहदोष आणि तथाकथित दैवी शक्तींच्या जाळ्यात अडकलेले दिसतात. ही विसंगती चिंताजनक आहे.

विशेषतः आर्थिक अडचणी, कौटुंबिक समस्या, आजारपण, बेरोजगारी, विवाहातील अडथळे किंवा मुलांच्या भविष्याची चिंता अशा परिस्थितीत माणूस मानसिकदृष्ट्या हतबल होतो. याच असहायतेचा फायदा काही भोंदू बाबा घेतात. समस्या सोडविण्याचे आमिष दाखवून हजारो-लाखो रुपये उकळले जातात. कुणाला भीती दाखवली जाते, कुणाला चमत्काराचे प्रलोभन दिले जाते, तर कुणाच्या श्रद्धेचा वापर करून त्यांचे शोषण केले जाते. काही प्रकरणांमध्ये महिलांचे लैंगिक शोषण, आर्थिक फसवणूक आणि कुटुंबांची मानसिक छळवणूकही घडते. हे प्रकार अत्यंत गंभीर आहेत. प्रश्न असा आहे की, अशा भोंदूगिरीला खतपाणी कोण घालते? केवळ अज्ञान की समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींचा पाठिंबा? अनेकदा राजकीय नेते, व्यावसायिक आणि प्रभावशाली व्यक्ती अशा स्वयंघोषित बाबांच्या दरबारात हजेरी लावतात. त्यांच्या उपस्थितीमुळे सामान्य माणसांमध्ये त्या बाबांविषयी विश्वास निर्माण होतो. एखाद्या व्यक्तीकडे मोठी गर्दी जमली, त्याच्या दरबारात राजकीय नेते गेले किंवा त्याने महागडी वाहने आणि आलिशान आश्रम उभे केले, म्हणून त्याच्याकडे दैवी शक्ती आहेत, असे समजण्याचे काहीच कारण नाही. उलट, या वैभवाचा पैसा कुठून येतो आणि त्यामागे कोणते व्यवहार आहेत, याची चौकशी होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राला संतांची, समाजसुधारकांची आणि विवेकवादी विचारवंतांची मोठी परंपरा लाभली आहे. संत तुकाराम महाराजांनी दांभिकतेवर प्रहार केला. महात्मा फुले यांनी अज्ञान आणि सामाजिक शोषणाविरोधात लढा दिला. राजर्षी शाहू महाराजांनी समतेचा विचार रुजवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि विवेकाची दिशा दाखवली. तर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याऐवजी आपण पुन्हा अंधश्रद्धेच्या गर्तेत जात असू, तर ही सामाजिक अधोगतीच म्हणावी लागेल. महाराष्ट्रात अंधश्रद्धा आणि जादूटोणाविरोधी कायदा अस्तित्वात आहे. मात्र, केवळ कायदा करून प्रश्न सुटणार नाही. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, भोंदूगिरीच्या तक्रारींची तातडीने चौकशी, आर्थिक व्यवहारांची तपासणी आणि पीडितांना संरक्षण देणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांमध्ये राजकीय दबाव किंवा सामाजिक प्रतिष्ठेचा विचार न करता दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. याचबरोबर शिक्षणव्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि संविधानातील मूलभूत कर्तव्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याची भावना रुजवली पाहिजे. पालकांनी मुलांना प्रश्न विचारायला शिकवले पाहिजे. कोणताही दावा ऐकला की त्यामागील सत्य तपासण्याची सवय निर्माण केली पाहिजे. श्रद्धा असावी, पण ती विवेकाला गहाण ठेवणारी नसावी.

अवैध मटका-जुगार चालकावर एमपीडीएअंतर्गत कारवाई; नाशिक कारागृहात रवानगी

विश्रांतवाडी पोलिसांची धडक कारवाई; पाच वर्षांत चार गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगाराला स्थानबद्ध



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे शहरातील अवैध मटका आणि जुगार व्यवसायाला आळा घालण्यासाठी विश्रांतवाडी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. परिसरात अवैध मटका-जुगार चालविणाऱ्या रवि शिवाजी शिंदे (वय ५७, रा. बालाजीनगर, टेल्को रोड, भोसरी) याच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक तरतुदींअंतर्गत नव्हे, तर महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व व्हिडिओ पायरेट्स यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या अधिनियमांतर्गत (एमपीडीए) कारवाई करण्यात आली आहे. त्याला स्थानबद्ध करण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर १७ नोव्हेंबर २०२६ रोजी नाशिक जिल्हा कारागृहात रवाना करण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवि शिवाजी शिंदे हा विश्रांतवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैध मटका व जुगार चालविण्याचे तसेच जुगार खेळविण्याचे प्रकार करत होता. त्याच्याविरुद्ध मागील पाच वर्षांत चार गुन्हे दाखल आहेत. त्याच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व व्हिडिओ पायरेट्स यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम १९८१ (एमपीडीए कायदा) कलम ३(२) अन्वये स्थानबद्धतेचे आदेश पारित केले. त्यानुसार विश्रांतवाडी पोलिसांनी कारवाई करून आरोपीला ताब्यात घेत नाशिक जिल्हा कारागृहात पाठविले. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ चार चिलुमुला रजनीकांत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

विश्रांतवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) नीलकंठ जगताप, संपतराव राऊत, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील उगले, सहायक पोलीस उपनिरीक्षक मनोज शिंदे, पोलीस हवालदार सुनील हसबे, महिला पोलीस हवालदार विद्या पानसरे तसेच सह्हिलन्स विभाग आणि तपास पथकातील कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. विश्रांतवाडी पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध मटका-जुगार व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा गुन्हेगारी प्रवृत्तींविरुद्ध पोलिसांचा कारवाईचा बडगा कायम राहणार असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



धुळे राज्यस्तरीय योग स्पर्धेत कोथरूडच्या १६ मुलींची सुवर्णभरारी

- मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून विशेष कौतुक

पुणे (आरंभ पर्व) : धुळे येथे महाराष्ट्र योग शिक्षक संघटनेच्या वतीने आयोजित सहाव्या महाराष्ट्र योगशिक्षक संमेलनांतर्गत पार पडलेल्या राज्यस्तरीय योग स्पर्धेत कोथरूडमधील 'मानसी-प्रेरणा फाऊंडेशन'च्या १६ मुलींनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे कोथरूडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सर्व यशस्वी मुलींचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे विशेष अभिनंदन केले आहे. कोथरूडमधील विविध वस्त्यांमधील गुणी आणि प्रतिभावान मुला-मुलींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना योग्य दिशा, प्रशिक्षण व व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून 'मानसी-प्रेरणा फाऊंडेशन' कार्यरत आहे. या माध्यमातून गुणवंत मुलींना सातत्याने प्रोत्साहन देऊन त्यांना आपली कला आणि कौशल्य सिद्ध करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. धुळे येथील या स्पर्धेत मुलींनी मिळवलेले यश हे त्यांच्या जिद्दीचे, मेहनतीचे आणि सातत्यपूर्ण सरावाचे फलित आहे. या यशामुळे या मुलींचा आत्मविश्वास द्विगुणित झाला असून, परिसरातील इतर मुलींनाही विविध क्षेत्रांत पुढे जाण्याची नवी प्रेरणा मिळाली आहे. या मुलींना उत्तम योगप्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षिका उल्का अलकुंटे, तन्वी फाटक, गौरी पाटील आणि सविता गोटूरकर यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तसेच, मुलींच्या जडणघडणीसाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मोलाचे योगदान दिल्याबद्दल फाऊंडेशनच्या संचालिका मुग्धा भागवत यांचेही चंद्रकांत पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




हणबरवाडीत किल्ले स्पर्धेतील विजेत्यांचा उत्साहात गौरव!

मसूर (आरंभ पर्व) : छत्रपती शिवाजी महाराजांचे अतुलनीय शौर्य, पराक्रम आणि स्वराज्यनिर्मितीचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हणबरवाडी (ता. कराड) येथे दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य किल्ले स्पर्धेचा नुकताच बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. स्पर्धेचे यंदा पाचवे वर्ष होते. या स्पर्धेत सहभागी झालेल्या बालचिमुकल्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून राजगड, रायगड, प्रतापगड यांसह विविध ऐतिहासिक गडकोटांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या होत्या. या स्पर्धेतील विजेते, उपविजेते तसेच सहभागी स्पर्धकांना रोख पारितोषिके, प्रमाणपत्र आणि शाल देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे, केवळ विजेत्यांचाच नव्हे तर स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या प्रत्येक बालकाचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे मुलांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चित्रपट लेखक-दिग्दर्शक रामकुमार शेडगे, सातारा पोलीस दलातील सिद्धनाथ शेडगे, लता शेडगे आणि गोरखनाथ शेडगे यांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सिद्धनाथ शेडगे म्हणाले "छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, त्यांची युद्धनीती, दूरदृष्टी आणि स्वराज्य उभारणीचा इतिहास आजच्या तरुण पिढीला समजणे अत्यंत आवश्यक आहे. किल्ले स्पर्धेसारख्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण होते. त्यांच्यात जिद्द, चिकाटी, शिस्त, कल्पकता आणि एकत्रित काम करण्याची भावना विकसित होते. पोलीस दलात कार्यरत असताना शिस्त, कर्तव्य आणि देशप्रेम यांचे महत्त्व मला प्रकर्षाने जाणवते.

आयर्न लेडी ऑफ इंडिया : भारतरत्न इंदिरा गांधी

- शशिकांत जाधव, पुणे
संवाद-९६५७७५२६६५



पुणे (दै. आरंभ पर्व)

जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचा देश असणाऱ्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान इंदिरा गांधी यांना मिळाला.इंदिरा गांधी यांचा जन्म १९ नोव्हेंबर, १९२७ रोजी झाला.भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून १९ जानेवारी १९६० ला त्यांनी देशाची सूत्रे हाती घेतली. पंधरा वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले.त्यातून त्यांची कणखरपणाची,चाणक्यनीति ची व दृढ निश्चयाची झलक दिसून येते.आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून मिळालेला देशसेवेचा वारसा त्यांनी पुढे अखंडपणे चालू ठेवला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही त्यांनी सहभाग घेतला होता.लहानपणी त्यांनी अलाहाबाद मध्ये ' वानर सेना ' नावाची सेना स्थापन केली होती त्यातून त्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध लढा उभा केला होता.महात्मा गांधीजींचा सहवास त्यांना लाभल्याने ' छोडो भारत ' आंदोलनातही त्यांनी सहभाग घेतला.कुशल,धाडसी,तडफदार व कणखर नेत्या म्हणून त्यांनी पंतप्रधानपदाची कारकीर्द गाजवली. अशा कर्तबगार आणि कर्तृत्ववान नेत्याचा १९ नोव्हेंबर हा जन्मदिवस दरवर्षी ' राष्ट्रीय एकात्मता दिन 'म्हणून साजरा केला जातो.

इंदिरा गांधींचे नेतृत्व व कर्तृत्व स्वयंभू जसे होते तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्व स्वयंसिद्ध व स्वयंप्रकाशित होते. पंतप्रधानपदाच्या कालावधीत त्यांनी १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले,तसेच पोखरण येथील अणुचाचणी,पहिली हरित क्रांती,पंजाब मधील ऑपरेशन ब्लू स्टार,बांगलादेशची निर्मिती,या त्यांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण घटना ठरल्या.१९७१ च्या पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात दाखवलेली मुसद्दीगिरीने त्यांच्या नावाची चर्चा सर्वत्र झाली.त्यांना ' आयर्न लेडी ऑफ इंडिया ' असे संबोधले जावू लागले.राष्ट्रहिताचा सातत्याने त्यांनी विचार केला. मात्र १९७७ ची आणीबाणी लागू करण्याचा निर्णय वादग्रस्त ठरला.३१ ऑक्टोबर १९८४ रोजी आपल्या पंतप्रधान कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या असताना त्यांच्याच अंगरक्षकांनी आकस्मिकपणे हल्ला केला. त्यातच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या या पोलादी नेत्याला अशाप्रकारे जगाचा निरोप घ्यावा लागला.त्या देशाचे ऐक्य आणि सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी अखेर पर्यंत कटीबद्ध राहील्या.' राष्ट्रीय एकात्मतेसाठी ' अखेर पर्यंत कटीबद्ध राहणा-या स्व.इंदिरा गांधी यांच्या १९ नोव्हेंबर या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

रुग्ण हक्क परिषदेच्या महाराष्ट्रातील सर्व कमिट्या बरखास्त!

- २४ नोव्हेंबरला पुण्यात राज्यव्यापी निर्धार मेळावा
- नव्या संघटनात्मक बांधणीची घोषणा

पुणे (दै. आरंभ पर्व)

रुग्ण हक्क परिषदेच्या संघटनात्मक पुनर्रचनेचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्हा, तालुका आणि शहर कमिट्या बरखास्त करण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व विद्यमान पदाधिकाऱ्यांची पदे रद्द करण्यात आली आहेत. रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली येत्या २४ नोव्हेंबर २०२६ रोजी पुण्यात राज्यव्यापी निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पुण्यासह महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके आणि शहरांमध्ये नव्या कमिट्यांची पुनर्रचना करण्यात येणार आहे. रुग्णांचे हक्क, सन्मान आणि न्यायासाठीची चळवळ राज्यभर अधिक मजबूत व व्यापक करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

मेळाव्याचा तपशील :
- दिनांक : २४ नोव्हेंबर २०२६
- वेळ : सकाळी ११ वाजता
- स्थळ : उद्यान प्रसाद मंगल कार्यालय, एस. पी. कॉलेजजवळ, खजिना विहीर चौक, सदाशिव पेठ, पुणे. महाराष्ट्रातील रुग्ण हक्क चळवळीच्या नव्या पर्वाची सुरुवात या निर्धार मेळाव्यातून होणार आहे.

'तू आहेस ना'मधून सुप्रिया पिळगावकर आणि सिद्धार्थ बोडके एकत्र

पुणे (दै. आरंभ पर्व)



लव्ह फिल्म्सने आपल्या दुसऱ्या मराठी चित्रपटाची घोषणा केली असून, 'तू आहेस ना' या चित्रपटात सुप्रिया पिळगावकर आणि सिद्धार्थ बोडके प्रमुख भूमिकांमध्ये झळकणार आहेत. चित्रपटाच्या फर्स्ट लूक पोस्टरचे अनावरण करून निर्मात्यांनी ही घोषणा केली आहे. मानवी नातेसंबंधांवर भाष्य करणारी ही एक हृदयस्पर्शी कथा असून, एका अनपेक्षित नात्यामुळे दोन व्यक्तींचे आयुष्य एकत्र येते आणि त्यांच्या आयुष्याला अशा प्रकारे नवे वळण मिळते, ज्याची त्यांनी कधी कल्पनाही केलेली नसते. 'तू आहेस ना' या चित्रपटात सुप्रिया पिळगावकर मध्यवर्ती भूमिकेत दिसणार आहेत. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टी, टेलिव्हिजन तसेच रंगभूमीवर अनेक दशकांचा अनुभव असलेल्या सुप्रिया पिळगावकर यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत विविध भूमिका साकारल्या आहेत. चित्रपटाची भावनिकदृष्ट्या प्रभावी कथा त्यांना विशेष भावली आणि त्यामुळेच हा प्रकल्प त्यांच्यासाठी खास ठरला. तर सिद्धार्थ बोडके यांच्यासाठी 'तू आहेस ना' हा लव्ह फिल्म्ससोबतचा दुसरा चित्रपट असून, यापूर्वी त्यांनी 'देवमाणूस'च्या माध्यमातून या टीमसोबत काम केले आहे.

दृष्टिहीन बांधवांच्या आयुष्यात दिवाळीचा गोडवा

कृष्णप्रिया फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व)



दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि गोडधोडाची मेजवानी. मात्र, डोळ्यांनी दिवाळीचा लखलखाट पाहता येत नसला, तरी या सणाचा गोडवा अनुभवता यावा आणि आनंदाचे क्षण सर्वांनाच अनुभवता यावेत, या सामाजिक भावनेतून कृष्णप्रिया सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या वतीने दृष्टिहीन बांधवांसाठी दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून दृष्टिहीन समाजघटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा आणि त्यांच्यासोबत सणाचा आनंद वाटून घेण्याचा संवेदनशील प्रयत्न करण्यात आला. सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यान येथे नुकताच हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा समाजसेविका सौ. कविता सिद्धेश्वर शिंपी-गिरी यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन करण्यात आले होते. यावेळी दृष्टिहीन बांधवांना दिवाळी फराळाचे वाटप करून त्यांच्यासोबत स्नेहपूर्ण संवाद साधण्यात आला. सण-उत्सव हे केवळ आनंद साजरा करण्याचे माध्यम नसून समाजातील प्रत्येक घटकाला आपलेपणाची जाणीव करून देण्याची संधी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दिवाळीच्या काळात सर्वत्र रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि आनंदाचे वातावरण असते. मात्र, समाजातील काही घटकांना या उत्सवाचा आनंद वेगळ्या पद्धतीने अनुभवावा लागतो. अशा वेळी त्यांच्यापर्यंत प्रेम, आपुलकी आणि माणुसकीचा दिवा पोहोचविणे हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी आहे. याच भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थित दृष्टिहीन बांधवांना सणाचा आनंद अनुभवता आला. केवळ फराळाचे वाटप न करता त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण घालविण्याला या उपक्रमात विशेष महत्त्व देण्यात आले.

या प्रसंगी राखी रवींद्र रासकर, अफरोज मन्सूरी, असद मुल्ला, सुजीत जगताप, किरण दादासाहेब चुंगे यांच्यासह फाऊंडेशनचे सहकारी कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

समाजातील गरजू, वंचित आणि दुर्लक्षित घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. दिवाळीचा प्रकाश केवळ घराघरांतच नव्हे, तर माणसांच्या मनामनांत पोहोचला पाहिजे, हा संदेश कृष्णप्रिया सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या या उपक्रमातून अधोरेखित झाला.

पुण्यात 'ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'ची स्थापना

पुणे (दै. आरंभ पर्व)



भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने ऑलकार्गो समूहाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. समूहाच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या 'अवश्य फाउंडेशन'च्या माध्यमातून पुण्यातील 'फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी'सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या भागीदारीतून विद्यापीठाच्या पुणे कॅम्पसमध्ये 'ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'ची स्थापना करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत लॉजिस्टिक्स अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट या विषयातील दोन वर्षांच्या एमबीए अभ्यासक्रमासाठी १०० गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना पूर्ण अर्थसहाय्य दिले जाणार आहे. विशेषतः वंचित घटकांतील, ग्रामीण भागातील आणि कुटुंबातून प्रथमच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही ही मोठी संधी ठरणार आहे. ऑलकार्गो समूहाचे अध्यक्ष व संस्थापक तसेच आयआयएम मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष शशी किरण शेट्टी यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम साकारत आहे. भारताच्या कौशल्य विकास मोहिमेला पाठबळ देण्यासाठी समूहाने १५ कोटी रुपयांचे योगदान देण्याचा संकल्प केला आहे. शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहिलेल्या तरुणांना उद्योगाभिमुख शिक्षण देऊन यशस्वी व्यावसायिक करिअर घडविण्यास सक्षम करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे. शशी किरण शेट्टी म्हणाले, "भारताच्या आर्थिक विकासात लॉजिस्टिक्स क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

मात्र, विशेषतः ग्रामीण आणि वंचित घटकांतील अनेक तरुणांना या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी आवश्यक दर्जेदार शिक्षण आणि कौशल्ये उपलब्ध होत नाहीत. ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्सच्या माध्यमातून ही दरी भरून काढण्याचा आमचा प्रयत्न आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



आमदार गोपीचंद पडळकर यांनी सिद्धार्थ भोकरे यांची घेतली भेट

सांगली (आरंभ पर्व) : प्रदेशाध्यक्ष मा. सिद्धार्थजी भोकरे यांच्या सांगली येथील निवासस्थानी आमदार मा. गोपीचंद पडळकर यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान विविध राजकीय, सामाजिक तसेच संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांनी सिद्धार्थ भोकरे यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. या सदिच्छा भेटीमुळे दोन्ही नेत्यांमध्ये स्नेहपूर्ण संवाद घडून आला. यावेळी उपस्थितांनीही दीपावलीच्या शुभेच्छांची देवाणघेवाण केली.



पोलीस व पत्रकारांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न!

- पत्रकार, पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग
- रक्तदानातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन

बारामती (आरंभ पर्व) : राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून बारामती शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस प्रशासन आणि पत्रकार बांधवांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला पत्रकार, पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच विविध सामाजिक क्षेत्रांत कार्यरत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून या रक्तदान शिबिराला सुरुवात झाली. रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून, आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते, हा सामाजिक संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला. पोलीस आणि पत्रकार हे समाजातील महत्त्वाचे घटक असून, कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच सामाजिक प्रश्नांबाबत जनजागृती करण्याचे कार्य दोन्ही घटक सातत्याने करत असतात. या दोन्ही घटकांनी एकत्र येत रक्तदानासारखा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. चैतन्य कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्रीमती मनीषा ओमासे तसेच बारामती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा. श्री. श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान करणाऱ्या सर्व पत्रकार बांधवांचे, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे आयोजकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे राष्ट्रीय पत्रकार दिनाला सेवाभावी कार्याची अनोखी जोड मिळाली.



म्हातारबा मोरडे यांचे निधन

आंबेगाव (आरंभ पर्व) : आंबेगाव तालुक्यातील प्रसिद्ध हॉटेल व्यवसायिक म्हातारबा मोरडे यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी राजश्री हरिभाऊ मोरडे मुलगा योगेश हरिभाऊ मोरडे दुसरा मुलगा भारतीय नौसेनेमध्ये कार्यरत असलेले संजय हरिभाऊ मोरडे मुलगी रेश्मा सदानंद शेवाळे पाटील मुलगी रीना अरुण लांडे नातवंडे असा मोठा परिवार आहे पुणे जिल्हा उपाध्यक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे उपाध्यक्ष सदानंद शेवाळे पाटील यांचे ते सासरे होत.

निसर्गचित्रांचे सहावे प्रदर्शन


पुणे (आरंभ पर्व) : ज्येष्ठ चित्रकार विलास कुलकर्णी आणि त्यांच्या 'गुरुकुल'मधील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या जलरंगातील निसर्गचित्रांचे सहावे प्रदर्शन बालगंधर्व कलादालन येथे २०, २१ आणि २२ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवार, १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता प्रसिद्ध चित्रकार आणि 'चिंटू' या लोकप्रिय व्यंगचित्रमालेचे जनक चारुहास पंडित यांच्या हस्ते होणार आहे.

तळजाई टेकडीवरील जमीन प्रकरणात ४०० कोटींचा महाघोटाळा?

पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मुख्यसभेची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप; केवळ २.२० कोटींच्या मोबदल्याचा विषय आता ४०० कोटींवर!

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे शहराचे फुफ्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तळजाई (पाचगाव पर्वती) येथील सर्व्हे क्रमांक ६७ ते ७३ मधील जमीन प्रकरणात पुणे महानगरपालिकेला तब्बल ४०० कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केवळ २ कोटी २० लाख रुपयांच्या मोबदल्याच्या विषयातून आता तब्बल ४०० कोटी रुपयांच्या आर्थिक दायित्वाचा प्रश्न निर्माण झाला असून, या संपूर्ण प्रकरणात पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मुख्यसभेची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप युवासेनेचे पुणे महानगर प्रमुख हेमंत (आबा) बागुल यांनी केला आहे. तळजाई टेकडी परिसरातील सुमारे १०० एकर जमिनीवर पूर्वी खासगी विकासकाकडून सुमारे १८० ते २०० भूखंडांचे तुकडे करून आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानंतर सन २००० मध्ये पुणे महानगरपालिकेने या परिसरात ऑक्सिजन पार्क विकसित करण्याच्या उद्देशाने भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली.



पुणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवाडा जाहीर करून भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली. या प्रक्रियेत काही जमीनधारकांना मोबदला मिळाला आणि सुमारे २० ते ३० एकर जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात आली. मात्र, उर्वरित सुमारे ७० एकर जमिनीच्या मालकांनी मोबदल्याच्या आणि भूसंपादनाच्या प्रश्नावर न्यायालयात धाव घेतली.

या प्रकरणातील भूखंड क्रमांक ४९ चे मालक खान यांच्या बाजूने मा. उच्च न्यायालयाने निकाल दिला. या निकालाविरोधात पुणे महानगरपालिकेच्या विधी विभागाने सर्वोच्च न्यायालयात अपील करणे अपेक्षित होते. मात्र, याबाबत महानगरपालिकेने योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली का, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, या संपूर्ण सुमारे १०० एकर क्षेत्राच्या विकासासाठी तत्कालीन नगरसेवक मा. आबा बागुल यांच्या माध्यमातून एक सर्वंकष विकास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed project Report) देखील तयार करण्यात आला होता. मात्र, काही घटकांनी या प्रकल्पाला विरोध केला. वास्तविक, महानगरपालिकेने हा DPR स्वीकारून त्यानुसार पुढील कार्यवाही केली असती, तर न्यायालयीन लढाईत महानगरपालिकेची बाजू अधिक सक्षमपणे मांडता आली असती, असे बागुल यांनी नमूद केले. आता या प्रकरणात न्यायालयाच्या अवमानाच्या आदेशाचा आधार घेत नव्याने दर निश्चित करण्यात आल्याची बाब समोर येत आहे. या दराचा लाभ उर्वरित सुमारे ७० एकर जमिनीवरील सर्व भूखंडधारकांना मिळण्याची शक्यता आहे.



पुणेकरांच्या पैशांवर कोणाचाही डोळा पडू देणार नाही. तळजाईच्या जमिनीचा प्रश्न हा केवळ जमिनीच्या मोबदल्याचा नसून पुणे शहराच्या आर्थिक हिताचा आणि पर्यावरणीय भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रकरणात पारदर्शकता राखून महानगरपालिकेचे होणारे संभाव्य ४०० कोटींचे नुकसान रोखण्यासाठी आम्ही आक्रमक भूमिका घेणार आहोत, असा इशाराही हेमंत आबा बागुल यांनी दिला.

- हेमंत आबा बागुल, पुणे महानगर प्रमुख, युवासेना

परिणामी, पुणे महानगरपालिकेवर सुमारे ४०० कोटी रुपयांचे अतिरिक्त आर्थिक दायित्व येऊ शकते. त्यामुळे सुरुवातीला केवळ २ कोटी २० लाख रुपयांच्या मोबदल्याशी संबंधित असलेला विषय आता महानगरपालिकेच्या तिजोरीवर शेकडो कोटींचा भार टाकणारा ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

प्रशासनाने वेळीच योग्य निर्णय घेतले असते, तर पुणेकरांच्या कररूपाने जमा झालेल्या पैशांचे एवढे मोठे नुकसान टाळता आले असते. केवळ २ कोटी २० लाख रुपयांच्या मुद्द्याचा आधार घेत ४०० कोटी रुपयांच्या आर्थिक दायित्वाचा मार्ग कसा मोकळा झाला, याची सखोल चौकशी झाली पाहिजे. या संपूर्ण प्रकरणात नेमकी कोणाची चूक आहे आणि महानगरपालिकेच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक कायदेशीर पावले का उचलली गेली नाहीत, याची उत्तरे प्रशासनाने दिली पाहिजेत, अशी मागणी हेमंत आबा बागुल यांनी केली. या संभाव्य आर्थिक नुकसानीच्या पार्श्वभूमीवर संबंधित निर्णय आणि पुढील कार्यवाहीला तातडीने स्थगिती देण्यात यावी, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी तसेच महानगरपालिकेच्या विधी विभागाने या प्रकरणातील सर्व न्यायालयीन आदेशांचा तातडीने आढावा घेऊन आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी पुणे महानगरपालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणाची सविस्तर तक्रार राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडेही करण्यात येणार असल्याचे बागुल यांनी स्पष्ट केले.

वासुकी बॉईजने जिंकला मल्हार चषक

जेजुरी (दै. आरंभ पर्व)

सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत एस.आर.आर. फाउंडेशन आयोजित पुरंदर प्रीमियर क्रिकेट लीगच्या स्पर्धेत महेश उबाळे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या तावडीतून वासुकी बॉईज जेजुरी संघाने ही स्पर्धा जिंकून मल्हार चषक जिंकला. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावाच्या काठी असलेल्या पालखी मैदानात एस.आर.आर. क्रिकेट फाउंडेशनच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी पुरंदर प्रीमियर लीग - मल्हार चषकाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत बारा संघ सहभागी झाले होते. पाच दिवसांत दिवसात 36 सामने खेळवले गेले. आयोजकांन आणि खेळाडूंनी खेळांद्वारे स्थानिक खेळाडूंनी उत्कृष्ट खेळी करत क्रिकेट रसिकांची मने जिंकली. या स्पर्धेत सर्वच सामन्यात जेजुरी एस.आर.आर. फाउंडेशनच्या वतीने या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केले होते. जेजुरी येथे भरविण्यात आलेल्या पुरंदर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा मल्हार चषक वासुकी बॉईज जेजुरी संघाने जिंकला. उत्कृष्ट खेळी करत महेश उबाळे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वासुकी बॉईज जेजुरी संघाने प्रथम क्रमांकाचा मल्हार चषक पटकाविला. या संघात रोख बक्षीस, चषक तसेच संघ चषकासोबत गाडी देण्यात आली. नाथासाहेब कधेकार यांनी दुसऱ्या, तृतीय, प्रेम उबाळे यांनी तृतीय, तर राजगड योद्धा जेजुरी संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. सर्व विजयी संघांना चषक व रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज निखिल चव्हाण - शांत, उत्कृष्ट गोलंदाज कमलेश राऊत जेजुरी, सामन्याचा मानकरी पुरस्कार अक्षय तांबे मोरगाव, व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक चेतक गोरे सोलापूर यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

एका स्वप्नातून उभा राहिला २५ वर्षांचा वारसा

- एम. ए. रंगूनवाला दंत महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव सुरू
- पुण्यातील एम. ए. रंगूनवाला दंत महाविद्यालयाचा शिक्षण, संशोधन आणि रुग्णसेवेतील २५ वर्षांचा प्रवास



पुणे (दै. आरंभ पर्व)

काही संस्था इमारतींमधून उभ्या राहतात, तर काही संस्था अशा स्वप्नांमधून जन्म घेतात, जी पुढील अनेक पिढ्यांचे आयुष्य घडवतात. असेच एक स्वप्न २५ वर्षांपूर्वी पुण्यात साकार झाले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला प्रगतीची संधी मिळावी, या विचारातून एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च सेंटरची स्थापना झाली. आज या महाविद्यालयाने २५ वर्षांचा प्रवास पूर्ण केला असून, 'सिल्व्हसी : द सिल्व्हर लेगसी ऑफ एमएआरडीसी' या संकल्पनेतून रौप्यमहोत्सवी कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. या महाविद्यालयाच्या उभारणीमागे रंगूनवाला कुटुंबाचे मोठे योगदान आहे. दिवंगत मोहम्मद अली रंगूनवाला आणि दिवंगत बनूबाई रंगूनवाला यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत आसिफ रंगूनवाला यांनी या कार्याला पाठिंबा दिला. जात, धर्म किंवा सामाजिक परिस्थिती कोणतीही असो, प्रत्येकाला चांगले शिक्षण मिळावे, हा त्यामागील मुख्य उद्देश होता. महाविद्यालयाची पायाभरणी २१ नोव्हेंबर १९९८ रोजी झाली. डॉ. पी. ए. इनामदार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीने या स्वप्नाला मूर्त रूप दिले. ११ नोव्हेंबर २००१ रोजी महाविद्यालयाचे उद्घाटन झाले आणि हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या प्रवासाची सुरुवात झाली. महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष, डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाच्या कुलपती आणि हाजी गुलाम मोहम्मद आझम एज्युकेशन ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती आबेदा पी. इनामदार म्हणाल्या, "रंगूनवाला कुटुंबाने आमच्यावर केवळ एक महाविद्यालय उभारण्याची जबाबदारी सोपवली नव्हती. शिक्षण आणि समाजसेवेच्या माध्यमातून अनेक पिढ्यांचे आयुष्य बदलण्याचे त्यांचे स्वप्न होते. डॉ. पी. ए. इनामदार यांच्या नेतृत्वाखाली ते स्वप्न प्रत्यक्षात आले. आज या महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी, शिक्षक आणि येथे उपचार घेतलेले रुग्ण यांच्यामधून त्या कार्याचे महत्त्व दिसून येते. संस्थापकांच्या स्वप्नाला पुढे घेऊन जाणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल." सुरुवातीला पदवी अभ्यासक्रम असलेल्या या महाविद्यालयात आता दंतवैद्यकाच्या आठ शाखांमध्ये पदव्युत्तर शिक्षण दिले जाते.

इंदापूर तहसीलदारांविरोधात सर्वपक्षीय एल्गार : २५ नोव्हेंबरला भव्य मोर्चाचे आयोजन

भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट), मनसे, शिवसेना शिंदे गटासह विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटना एकवटल्या; जनतेच्या प्रश्नांसाठी पक्षभेद बाजूला ठेवत एकजूट

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

इंदापूर तालुक्यातील महसूल प्रशासनाच्या कारभाराविरोधात आता विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना एकवटल्या असून, तहसील कार्यालयातील कथित अनियमितता, नागरिकांची होत असलेली गैरसोय आणि प्रलंबित कामांच्या प्रश्नावरून २५ नोव्हेंबर रोजी इंदापूर येथे भव्य सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. तहसीलदारांच्या कारभाराची सखोल चौकशी करून त्यांचे तातडीने निलंबन करावे, अशी प्रमुख मागणी या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. इंदापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.



या मोर्चामध्ये भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), रयत क्रांती सेना, भटक्या विमुक्त जमाती संघटना, स्वाभिमानी लहुजी सेना, भीमा कोरेगाव विजयारणस्तंभ सेवा संघ, संबंधित संघटना यांसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

पत्रकार परिषदेत उपस्थित सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी इंदापूर तहसील कार्यालयाच्या कामकाजाबाबत गंभीर आक्षेप नोंदवले. सातबारा उतारे, फेरफार नोंदी, वारस नोंदी, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रेशनकार्ड यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी सर्वसामान्य नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाचे हेलपाटे मारावे लागत असून, अनेक कामे महिनोनमहिने प्रलंबित राहत असल्याचा आरोप करण्यात आला.

विशेषतः शेतकरी आपल्या जमिनीशी संबंधित कामे घेऊन तहसील कार्यालयात गेल्यानंतर त्यांना अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची तक्रार यावेळी करण्यात आली. कामांमध्ये टाळाटाळ, अनावश्यक विलंब आणि नागरिकांशी उद्धटपणे वागणूक दिली जात असल्याचा आरोपही पदाधिकाऱ्यांनी केला. तहसील कार्यालयातील कथित भ्रष्टाचार आणि अनियमिततेची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी, दोषींवर कठोर कारवाई करावी व तहसीलदारांचे तातडीने निलंबन करावे, अशी मागणी या मोर्चातून करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेला संबोधित करताना भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रदीप गारटकर यांनी या आंदोलनात समाजातील सर्व सज्जन शक्तींनी सहभागी होण्याचे आवाहन केले. हा प्रश्न कोणत्याही एका राजकीय पक्षापुरता मर्यादित नसून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि जनतेच्या न्याय्य हक्कांशी संबंधित आहे. त्यामुळे २५ नोव्हेंबर रोजी इंदापूर तालुक्यातील जनतेने मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रवीण माने यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, इंदापूरच्या इतिहासात तहसील कार्यालयाच्या कारभाराविरोधात अशा प्रकारे सर्वपक्षीय मोर्चा काढण्याची वेळ येणे ही गंभीर बाब आहे. सर्वसामान्य जनतेची कामे वेळेत व्हावीत, नागरिकांना न्याय मिळावा आणि प्रशासनाने जनतेच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घ्यावी, या उद्देशाने हा मोर्चा आयोजित करण्यात येत आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राजकीय पातळीवर परस्परविरोधी भूमिका घेणारे विविध पक्ष आणि संघटना एका मुद्द्यावर एकत्र आल्याने इंदापूरच्या राजकीय वर्तुळात या आंदोलनाची चर्चा सुरू झाली आहे. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्रितपणे आवाज उठविण्याची भूमिका या पत्रकार परिषदेत मांडण्यात आली.

२५ नोव्हेंबर रोजी इंदापूर शहरातून हा मोर्चा काढण्यात येणार असून, त्यामध्ये शेतकरी, महिला, युवक, नागरिक आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. प्रशासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल न घेतल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. आता २५ नोव्हेंबरच्या मोर्चात किती मोठ्या प्रमाणावर जनसहभाग मिळतो, जिल्हा प्रशासन या तक्रारींची कितपत दखल घेते आणि महसूल विभागाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे संपूर्ण इंदापूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

यावेळी पत्रकार परिषदेसाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदीप गारटकर प्रवीण माने, आकाश कांबळे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे निवास शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे महारुद्र पाटील, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राजेंद्र हजारे, शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे नितीन शिंदे, महादेव सोमवंशी, रयत क्रांती सेनेचे निलेश देवकर, भटक्या विमुक्त जातीचे तानाजी धोत्रे, स्वाभिमानी लहुजी शक्ती संघटनेचे संतोष मोरे, भिमा कोरेगाव विजयारणस्तंभ सेवा संघाचे शरद चितारे यांच्यासह इतर सर्व पक्ष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केसनंदमध्ये पोलिसांचा थरारक सापळा

वाघोली पोलिसांचा धडाका! गोव्यातून आलेल्या पिस्तूल खरेदीदारांसह आंतरराज्य शस्त्रविक्री टोळीचा पर्दाफाश

चौघे जेरबंद; चार पिस्तुले, १५ जिवंत काडतुसे, दोन दुचाकींसह ४ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे शहरात अवैध शस्त्रांची खरेदी-विक्री करणाऱ्यांविरोधात वाघोली पोलिसांनी जोरदार कारवाई करत आंतरराज्य पिस्तूल विक्रीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. गोवा राज्यातून पिस्तूल खरेदी करण्यासाठी आलेल्या दोघांसह पिस्तूल विक्री करणारा रेकॉर्डवरील आरोपी आणि एका विधीसंघर्षित बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी चार पिस्तुले, १५ जिवंत काडतुसे, तीन मोबाईल फोन, रोख रक्कम आणि दोन दुचाकी असा एकूण तब्बल ४ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध शस्त्रविक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तसेच अवैध शस्त्र बाळगणारे आणि त्यांची विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोली पोलिसांनी गुन्हेगारांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले होते. दरम्यान, १६ नोव्हेंबर २०२६ रोजी पोलीस हवालदार प्रदीप मोटे यांना गोवा राज्यातून दोन इसम केटीएम दुचाकीवरून (क्रमांक GA03AN0434) केसनंद परिसरात आले असून, ते रेकॉर्डवरील आरोपी आकाश मोरे याच्याकडून पिस्तूल खरेदी करणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर राघु आणि पोलीस हवालदार प्रदीप मोटे यांच्या नेतृत्वाखाली दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. पोलिसांनी केसनंद गाव परिसरात सापळा रचला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. अखेर पिस्तूल विक्रीचा व्यवहार सुरू असतानाच पोलिसांनी अचानक छापा टाकत आरोपी आकाश मोरे, गोव्याहून पिस्तूल खरेदीसाठी आलेले दोन इसम आणि एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान पोलिसांना चार पिस्तुले मॅगझीनसह, एक रिकामी मॅगझीन आणि १५ जिवंत काडतुसे आढळून आली. याशिवाय तीन मोबाईल फोन, रोख रक्कम आणि दोन दुचाकी असा एकूण ४ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या टोळीचे गोवा आणि पुणे यांच्यातील शस्त्रविक्रीचे नेमके जाळे किती विस्तृत आहे, या पिस्तुलांचा पुरवठा कुठून होत होता आणि या शस्त्रांचा वापर अन्य गुन्ह्यांमध्ये झाला आहे का, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. या कारवाईमुळे अवैध शस्त्रविक्रीच्या आंतरराज्य नेटवर्कचा छडा लावण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, पोलीस निरीक्षक मंगेश जगताप, पोलीस उपनिरीक्षक शिवशंकर राघु, सहायक पोलीस फौजदार बाळासाहेब मोराळे, पोलीस हवालदार प्रदीप मोटे तसेच पोलीस अंमलदार विशाल गायकवाड, मारुती वाघमारे, अशोक शेळके, गहिनीनाथ बोयणे, महादेव कुंभार, ओमल सरतापे, पांडुरंग माने, ऋषिकेश व्यवहारे, समीर भोरडे, योगेश शिंदे, राहुल गोरे आणि अमोल घावटे यांनी ही कामगिरी केली. वाघोली पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे अवैध शस्त्रविक्री करणाऱ्यांना स्पष्ट इशारा मिळाला असून, पुणे शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



पुण्यात 'ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'ची स्थापना

- १०० विद्यार्थ्यांना पूर्ण अर्थसहाय्यित एमबीएची संधी
- ऑलकार्गो समूहाचा 'फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी'शी सामंजस्य करार
- लॉजिस्टिक्स क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ घडविण्यावर भर

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने ऑलकार्गो समूहाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. समूहाच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या 'अवश्य फाउंडेशन'च्या माध्यमातून पुण्यातील 'फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी'सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या भागीदारीतून विद्यापीठाच्या पुणे कॅम्पसमध्ये 'ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'ची स्थापना करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत लॉजिस्टिक्स अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट या विषयातील दोन वर्षांच्या एमबीए अभ्यासक्रमासाठी १०० गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना पूर्ण अर्थसहाय्य दिले जाणार आहे. विशेषतः वंचित घटकांतील, ग्रामीण भागातील आणि कुटुंबातून प्रथमच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही ही मोठी संधी ठरणार आहे. ऑलकार्गो समूहाचे अध्यक्ष व संस्थापक तसेच आयआयएम मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष शशी किरण शेट्टी यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम साकारत आहे. भारताच्या कौशल्य विकास मोहिमेला पाठबळ देण्यासाठी समूहाने १५ कोटी रुपयांचे योगदान देण्याचा संकल्प केला आहे. शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहिलेल्या तरुणांना उद्योगाभिमुख शिक्षण देऊन यशस्वी व्यावसायिक करिअर घडविण्यास सक्षम करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे.



शिवराज साने यांना समावेशक समाज प्रेरणा पुरस्कार २०२६ प्रदान

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : कला पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समिती महाराष्ट्र राज्य आयोजित युवा परिवर्तन परिषद व गुणगौरव सोहळा मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणाऱ्या या सोहळ्यात. हवेली तालुक्यातील उरुळी कांचन येथील संगीतकार शिवराज साने यांच्या संगीत कला क्षेत्रातील योगदान गेली अनेक वर्ष कार्यरत असून शिवराज साने यांनी लोककलेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर समाज प्रबोधन जनजागृती कार्यक्रम पर्यावरण, स्वच्छता, अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या, शिक्षण, झाडे लावा, माती आडवा पाणी जिरवा, पथनाट्य, देशभक्ती गीत, भारुड, आरोग्य राष्ट्रीय सण, महापुरुषावर गीत गायन या सर्व कार्याची विशेष दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण संगीत आणि जनजागृतीचा त्रिवेणी संगम सामाजिक धार्मिक असे ज्येष्ठ संगीतकार शिवराज ज्ञानोबा साने हे साने संगीत विद्यालयाचे संस्थापक असून रेनबो इंटरनॅशनल स्कूल कदम वस्ती लोणी काळभोर तसेच इन व्हिटिव इंटरनॅशनल स्कूल हडपसर तेथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. संगीत ही केवळ कला नसून ती संस्काराची संस्कृतीची आणि समाजप्रबोधनाची प्रभावी भाषा आहे असे मत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रुती पारकर यांनी मांडले. उपस्थित प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते सुधीर गोडबोले, संस्थापक अध्यक्ष नारीशक्ती फाउंडेशन रत्नागिरी रंजना मोहिते, समाजसेवक अरुण दळवी, कार्यक्रमाचे आयोजक डॉ.बी.एन. खरात, संस्थापक अध्यक्ष तसेच सम्राट बहुउद्देशीय जनजागृती सेवाभावी संस्था अध्यक्षा रेखा साने आदी उपस्थित होते. शिवराज साने यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या सातत्यपूर्ण संगीत साधनेचा विद्यार्थ्यांना दिलेल्या मार्गदर्शनाचा आणि समाजप्रबोधनासाठी च्या योगदानाचा गौरव आहे. त्यांच्या या यशामुळे उरुळी कांचन सह संपूर्ण हवेली तालुक्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

हँडबॅगच्या रचनेतून साकारले मिराजिओचे नवे स्टोअर

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतातील वेगाने वाढणाऱ्या हँडबॅग आणि ॲक्सेसरीज ब्रँड्सपैकी एक असलेल्या मिराजिओने पुण्यातील औंध येथील वेस्टएंड मॉलमध्ये आपले तिसरे रिटेल स्टोअर सुरू केले आहे. ब्रँडच्या विस्तारणाऱ्या रिटेल व्यवसायातील हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. मॉलच्या G2 मजल्यावर 534 चौरस फूट क्षेत्रफळात विस्तारलेल्या या स्टोअरच्या माध्यमातून मिराजिओने आपल्या डिझाइन तत्त्वज्ञानाला प्रत्यक्ष खरेदीच्या अनुभवात रूपांतरित केले आहे. मिराजिओच्या हँडबॅगच्या अंतर्गत रचनेची संकल्पना एका संपूर्ण खोलीच्या आकारात साकारून या स्टोअरची रचना करण्यात आली आहे. हँडबॅगची संरचना आणि कार्यक्षमता यांपासून प्रेरणा घेत, या जागेची मांडणी विविध स्वतंत्र कप्प्यांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक कप्प्याची स्वतःची वेगळी साहित्यरचना, प्रकाशयोजना आणि दृश्यात्मक वैशिष्ट्ये आहेत. हँडबॅगची हुबेहूब प्रतिकृती साकारण्याऐवजी, तिच्यामध्ये विविध वस्तूंची सुबक मांडणी आणि साठवणूक कशा प्रकारे केली जाते, ही संकल्पना एकसंध रिटेल अनुभवाच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे. वास्तुरचनेच्या माध्यमातून मिराजिओची आकाररचना आणि कार्यक्षमतेविषयीची विचारधारा प्रत्यक्षात उतरवण्यात आली आहे.



'आधी स्त्रीचा सन्मान करायला शिका!'

इंदुरीकर महाराजांच्या वादग्रस्त विधानावर तृप्ती देसाई आक्रमक

- मुलींच्या प्रेमाबाबत सरसकट विधान करून संपूर्ण स्त्रीवर्गाचा अपमान करू नका; तृप्ती देसाई यांचा संताप



पुणे (दै. आरंभ पर्व)

इंदुरीकर महाराज यांच्या मुलींबाबतच्या वादग्रस्त विधानावर सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मुलींच्या चारित्र्यावर आणि प्रेमावर भाष्य करण्यापूर्वी स्त्रीचा सन्मान करायला शिका, अशा शब्दांत त्यांनी इंदुरीकर महाराज यांना सुनावले आहे. मुलींच्या सन्मानाचा प्रश्न हा केवळ एका समाजाचा किंवा एका व्यक्तीचा नसून संपूर्ण स्त्रीवर्गाच्या स्वाभिमानाचा प्रश्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. 'मुली मुलांवर प्रेम करत नाहीत, तर पैशांवर प्रेम करतात,' असे सरसकट विधान करून संपूर्ण स्त्रीवर्गाचा अपमान केला जात असल्याचा आरोप तृप्ती देसाई यांनी केला. आजच्या काळात मुली शिक्षण, उद्योग, प्रशासन, राजकारण आणि सामाजिक कार्य अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. स्वतःच्या मेहनतीवर त्या कुटुंबाचा आधार बनत आहेत. अशा असंख्य मुलींच्या कर्तृत्वाला एका विधानातून कमी लेखण्याचा अधिकार कोणाला दिला, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. कीर्तन हे समाजाला योग्य दिशा देण्यासाठी असते, महिलांना बदनाम करण्यासाठी नाही, असे ठाम मत व्यक्त करताना देसाई म्हणाल्या की, संतपरंपरेने नेहमीच स्त्रीशक्तीचा सन्मान, समानता आणि मानवतेचा संदेश दिला आहे. त्यामुळे संतांच्या विचारांचा वारसा सांगताना स्त्रियांच्या सन्मानाचे भान ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. मुलींना पैशांच्या तराजूत तोलण्यापेक्षा त्यांच्या कर्तृत्वाचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा सन्मान करायला शिकले पाहिजे. स्त्री ही कोणाच्या पैशावर जगणारी नसून स्वतःच्या कर्तृत्वावर जगण्याची ताकद ठेवणारी शक्ती आहे, असे परखड मत तृप्ती देसाई यांनी व्यक्त केले. इंदुरीकर महाराज यांच्या या विधानामुळे स्त्री-सन्मान आणि सामाजिक जबाबदारीच्या मुद्द्यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

उत्तर पुणे जिल्ह्यात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

- जुगार, मटका आणि दारू विक्रीमुळे अनेक संसार उद्ध्वस्त!
- अवैध धंदे जोमात, पोलीस यंत्रणा कोमात?
- महिलांच्या कष्टाच्या कमाईवर व्यसनाधीनांचा डल्ला
- पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांचे गंभीर प्रश्न
- जुन्नर, आंबेगाव, खेड परिसरात अवैध व्यवसायांच्या वाढत्या तक्रारी
- हप्तेखोरीच्या आरोपांची चौकशी करण्याची नागरिकांची मागणी



अवैध धंद्यांमुळे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत नाही, तर अनेक कुटुंबांचे आर्थिक आणि सामाजिक जीवनही विस्कळीत होते. विशेषतः महिलांच्या कष्टावर उभ्या असलेल्या संसाराला व्यसनाधीनतेचा फटका बसत असेल, तर ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पुणे (सोमनाथ साळुंके)
(दै. आरंभ पर्व)

विद्येचे माहेरघर आणि स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अवैध धंद्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उत्तर पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव आणि खेड तालुक्यांतील काही भागांत जुगार, मटका आणि अवैध दारू विक्री सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. या अवैध व्यवसायांमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडत असून, विशेषतः महिलांना कौटुंबिक आणि आर्थिक संकटांचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. एकीकडे अवैध धंद्यांबाबत तक्रारी वाढत असताना दुसरीकडे कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे 'अवैध धंदे जोमात आणि पोलीस यंत्रणा कोमात' अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

पुणे जिल्ह्याची ओळख शिक्षण, संस्कृती आणि आधुनिक विकासाचे केंद्र म्हणून आहे. मात्र, ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न पाहता या प्रतिमेला तडा जात असल्याची चर्चा आहे. डोंगरदऱ्यांत वसलेले जुन्नर, आंबेगाव आणि खेड हे तालुके आदिवासीबहुल भाग म्हणूनही ओळखले जातात. ग्रामीण जनतेच्या सुरक्षिततेसाठी विविध ठिकाणी पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. मात्र, पोलीस ठाण्यांच्या हद्दीतच अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत असतील, तर या यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

जुन्नर तालुका ऐतिहासिक वारसा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मभूमीमुळे विशेष ओळखला जातो. पर्यटनाच्या वाढत्या संधींमुळे या भागात हॉटेल, ढाबे आणि विविध व्यवसायांची संख्या वाढली आहे. मात्र, काही ढाबे आणि हॉटेलच्या नावाखाली अनधिकृतपणे दारू विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. अशा ठिकाणी तरुणांची गर्दी वाढत असून, काही तरुण व्यसनांच्या आहारी जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जुगार आणि मटक्याच्या व्यवसायानेही काही भागांत पाय पसरल्याच्या तक्रारी आहेत. रोजगारासाठी कष्ट करणाऱ्या महिलांना घरखर्च भागविण्यासाठी मोलमजुरी करावी लागत असताना, त्यांच्या कष्टाच्या कमाईतील पैसे व्यसनाधीन पतींकडून जुगार आणि मटक्यावर खर्च केले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. परिणामी, अनेक कुटुंबांमध्ये आर्थिक वाद, मानसिक ग्रास आणि कौटुंबिक कलह वाढत आहेत. काही महिलांना तर रात्रीची चूल पेटविणेही कठीण होत असल्याची विदारक परिस्थिती आहे.

या अवैध व्यवसायांमागे संबंधित व्यावसायिक आणि काही पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये आर्थिक व्यवहार होत असल्याचे आरोपही नागरिकांकडून केले जात आहेत. दरमहा हप्ते ठरवून अवैध व्यवसायांना अभय दिले जात असल्याची चर्चा परिसरात आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे. जर या तक्रारींमध्ये तथ्य आढळले, तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतीलच काही घटकांकडून अशा व्यवसायांकडे दुर्लक्ष होत असेल, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कोणाकडे, असा सवाल उपस्थित होत आहे.

नारायणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतही मटका व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. या परिसरातील काही कुटुंबांनाही व्यसनाधीनतेचा फटका बसत असल्याचे सांगितले जाते. अवैध व्यवसायांवर वेळीच कारवाई न झाल्यास त्याचे सामाजिक परिणाम अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

आंबेगाव तालुक्यात पारगाव-शिंगवे येथे सुमारे दीड वर्षापूर्वी नवीन पोलीस ठाणे सुरू करण्यात आले. भीमा सहकारी साखर कारखान्यामुळे या परिसरात राज्यातील तसेच परराज्यातील अनेक नागरिक कामानिमित्त वास्तव्यास आहेत. मात्र, पोलीस ठाण्याच्या हद्दीत आणि पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या काही ढाब्यांवर दारू विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे पोलीस ठाणे उभारण्यामागील कायदा व सुव्यवस्था राखण्याचा उद्देश प्रत्यक्षात कितपत साध्य होत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, पुणे शहरात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली अवैध व्यवसायांविरोधात सुरू असलेल्या कारवायांचा संदर्भ देत ग्रामीण भागातही अशाच प्रकारे कठोर अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पुणे ग्रामीण पोलीस प्रशासनाने अवैध जुगार, मटका आणि दारू विक्रीविरोधात विशेष मोहीम राबवावी. संबंधित पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील कारभाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपासणी करावी आणि हप्तेखोरीच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

महिलांच्या तक्रारींची दखल कोण घेणार?

जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील काही भागांत अवैध धंद्यांमुळे कुटुंबे अडचणीत येत असल्याच्या तक्रारी महिला आणि नागरिकांकडून केल्या जात आहेत. मात्र, तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याची त्यांची भावना आहे. महिलांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असेल, तर ग्रामीण भागातील पोलीस यंत्रणा सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी नेमकी कितपत तत्पर आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागरिकांना तक्रारींसाठी ११२ या आपत्कालीन क्रमांकाचा आधार घ्यावा लागत असेल, तर स्थानिक पातळीवरील तक्रार निवारण व्यवस्थेचेही परीक्षण होणे गरजेचे आहे.

सात-आठ वर्षांपासून एकाच ठिकाणी कर्मचारी?

जुन्नर पोलीस ठाण्यात गेली सात ते आठ वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्याच्या कार्यपद्धतीवरून काही काळापूर्वी चर्चा सुरू झाली होती. या संदर्भातील पाठपुरावा सुरू असतानाच पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्डे सुरू असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्याची बदली झाली की नाही, याबाबतही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करून आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे



जारकरवाडी प्रीमियर लीगमध्ये अहिल्यादेवी संघाला प्रथम क्रमांक

- माऊली संघ द्वितीय, तर वीरभद्र संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी
- चतुर्थ क्रमांक भक्ती शक्ती क्रिकेट क्लब

आंबेगाव (आरंभ पर्व) : जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथे भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जारकरवाडी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत गावातील विविध क्रिकेट संघांनी सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या स्पर्धेमध्ये बिरोबा, माऊली, वीरभद्र, महाकालेश्वर, जय मल्हार, श्री गणेशा, वडजादेवी, अहिल्यादेवी आणि भक्ती शक्ती आदी संघांनी सहभाग नोंदविला होता. अटीतटीच्या सामन्यांनंतर अहिल्यादेवी क्रिकेट क्लबने प्रथम क्रमांक पटकावला. माऊली क्रिकेट क्लबने द्वितीय, वीरभद्र क्रिकेट क्लबने तृतीय, तर भक्ती शक्ती क्रिकेट क्लबने चतुर्थ क्रमांक मिळविला. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघांना गावातील मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. गावातील युवकांमध्ये क्रीडाभावना वाढीस लागावी, तसेच सामाजिक एकोपा निर्माण व्हावा, या उद्देशाने भक्ती शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने स्पर्धेचे आयोजन व नियोजन करण्यात आले होते. स्पर्धेला क्रिकेटप्रेमी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयाला आयसीएमआरची राष्ट्रीय मोहर

पिंपरी, पुणे (आरंभ पर्व) : भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (Indian Council of Medical Research – ICMR) यांनी डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे यांना आयसीएमआरचे सहयोगी उत्कृष्टता केंद्र (ICMR Collaborating Centre of Excellence – ICMR-CCoE) म्हणून मान्यता दिली आहे. संस्थेची संशोधन क्षमता, जैववैद्यकीय विज्ञानातील योगदान आणि भारताच्या राष्ट्रीय आरोग्य प्राधान्यांनुसार विविध शाखांमधील सहयोगात्मक संशोधनाप्रती असलेली बांधिलकी या राष्ट्रीय सन्मानामुळे अधोरेखित झाली आहे. आयसीएमआरच्या सहयोगी उत्कृष्टता केंद्र या उपक्रमांतर्गत अशा संशोधन गटांची निवड केली जाते, ज्यांनी प्रभावी अभ्यास, महत्त्वपूर्ण वैज्ञानिक योगदान आणि आयसीएमआर व त्याच्या संलग्न संस्थांसोबतच्या सहकार्यातून आपली उत्कृष्टता सिद्ध केली आहे. केवळ सन्मान देणे एवढाच याचा उद्देश नसून, माहिती, सेवा, वैज्ञानिक तपासणी आणि प्रशिक्षण या क्षेत्रांतील देशाची संशोधन संसाधने बळकट करणे व आयसीएमआर आणि मान्यताप्राप्त केंद्रे यांतील भागीदारी अधिक दृढ करणे हा यामागील मुख्य हेतू आहे.

माय ईव्ही सर्व्हिसचे पुण्यात पहिले मल्टी-ब्रँड ईव्ही सर्व्हिस हब सुरू



पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील इलेक्ट्रिक दुचाकी आणि तीनचाकी वाहनधारकांसाठी आता स्वतंत्र बहु-कंपनी सेवा केंद्र उपलब्ध झाले आहे. ऑटोबॉट ई-मोबिलिटी सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माय ईव्ही सर्व्हिस या ब्रँडअंतर्गत कंपनीने आपले पहिले कंपनीद्वारे संचालित ईव्ही सर्व्हिस हब, पांडुरंग ईव्ही सर्व्हिस हब, ज्योतिबा नगर, तळवडे, पिंपरी-चिंचवड येथे सुरू केले. भोसरी, पिंपरी-चिंचवडचे आमदार महेशदादा लांडगे यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. ते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या केंद्रात आजपासून दैनंदिन प्रवासासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करणारे नागरिक, वितरण सेवांमध्ये कार्यरत वाहनचालक आणि रिक्षाचालक आपल्या वाहनांची तांत्रिक तपासणी, नियमित देखभाल आणि दुरुस्ती करून घेऊ शकतील. कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी प्रत्येक वाहनाची अनिवार्य तांत्रिक तपासणी केली जाईल. त्यानंतर ग्राहकांना करावयाच्या कामांचा आणि त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा तपशीलवार अंदाज दिला जाईल. सशुल्क काम ग्राहकांच्या मंजुरीनंतरच सुरू केले जाईल. दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर वाहनाची गुणवत्ता तपासणी केली जाईल आणि ग्राहकांना बिलासह डिजिटल सेवा नोंद दिली जाईल. हे ईव्ही सर्व्हिस हब आठवड्यातील सहा दिवस सकाळी ९ ते सायंकाळी ७ या वेळेत सुरू राहील. गुरुवारी ईव्ही सर्व्हिस हब बंद असेल. सेवा बुकिंग केवळ माय ईव्ही सर्व्हिस ॲप किंवा कंपनीच्या myevservice.in या संकेतस्थळावरून करता येईल.



१९ नोव्हेंबरपासून दंतचिकित्सा व दंतरोपणावर आंतरराष्ट्रीय परिषद

पुणे (आरंभ पर्व) : दंतचिकित्सा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल उपचारपद्धती आणि दंतरोपणातील नव्या संशोधनाची माहिती दंतवैद्यांना उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे (आयएसडीडी) १९ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत चार दिवसीय तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'अत्याधुनिक दंतचिकित्सा व दंतरोपण' हा या परिषदेचा मुख्य विषय असून, देश-विदेशातील सुमारे ६०० ते ७०० दंतवैद्यक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे ही परिषद होणार आहे. शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार असून, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबाने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आयएसडीडीचे अध्यक्ष डॉ. रत्नदीप जाधव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. विजयकुमार ताम्हाणे तसेच संचालक व खजिनदार डॉ. कौस्तुभ पाटील उपस्थित होते.

कायमस्वरूपी नगररचनाकार अधिकाऱ्याची नियुक्ती करा

भाजप शहराध्यक्ष सुशांत थोरात यांची मागणी



आंबेगाव (दै. आरंभ पर्व)

आंबेगाव तालुक्यातील मंचर नगरपंचायतीमध्ये गेल्या तीन वर्षांपासून सहाय्यक नगररचनाकार अधिकारी कार्यरत नसल्याने प्रारूप विकास आराखड्यावर नागरिकांनी नोंदविलेल्या हरकतींचे निराकरण कोण करणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर मंचर नगरपंचायतीत कायमस्वरूपी नगररचनाकार अधिकाऱ्याची तातडीने नियुक्ती करावी, अशी मागणी भाजपचे मंचर शहराध्यक्ष सुशांत थोरात पाटील यांनी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मंचर शहराच्या प्रारूप विकास आराखड्यात शेतकऱ्यांच्या सुपीक व बागायती जमिनींवर विविध आरक्षणे तसेच १२ ते १५ मीटर रुंदीचे रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, या आराखड्याविरोधात अनेक हरकती व तक्रारी दाखल होत आहेत. मात्र, नगरपंचायतीमध्ये कायमस्वरूपी नगररचनाकार अधिकारी नसल्याने या हरकतींची तांत्रिक तपासणी आणि योग्य पद्धतीने निराकरण होण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विकास आराखड्याचे नव्याने फेरसर्वेक्षण करावे, नागरिक, शेतकरी व तज्ज्ञांना विश्वासात घेऊन सुधारित आराखडा तयार करावा, पर्यायी रस्ते उपलब्ध असताना खासगी जमिनींमधून नवीन रस्ते प्रस्तावित करू नयेत, अनावश्यक आरक्षणे रद्द करावीत तसेच शक्य त्या ठिकाणी रस्त्यांची रुंदी ९ ते १० मीटर ठेवावी, अशा मागण्याही निवेदनात करण्यात आल्या आहेत. यावेळी नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष संदीप थोरात, मुख्याधिकारी किरण मार्कंड व नगरसेवकांनी निवेदन स्वीकारले. भाजपचे जिल्हा सचिव संदीप बाणखेले, उद्योग आघाडीचे अध्यक्ष प्रमोद बाणखेले, गणेश बाणखेले, तुषार बाणखेले, सूरज धरम, सोनाली काळे आदी उपस्थित होते.

कौशल्य विकास केंद्र सुरू करणार : आ. हर्षदा देशमुख

जेजुरी (दै. आरंभ पर्व)

पुणे विभागातील युवा वर्गाबरोबरच जुन्या जाणत्या नेते व कार्यकर्त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून निवडणुकीत यश मिळवून दिले. पुरंदर तालुक्यातील साकुर्डे गाव माझे सासर असल्याने एक सून म्हणून पुरंदरकरांनी दिलेल्या या पाच वर्षाच्या संधीचे मी सोने करणार आहे. ते यश तुमचे सर्वांचे आहे. तालुक्यातील कौशल्य विकास केंद्र सुरू करून युवकांना रोजगाराची संधी निर्माण करू, असे आ. हर्षदा देशमुख जाधव यांनी साकुर्डे (ता. पुरंदर) येथे नागरी सत्कार सोहळ्यात व्यक्त केले. अध्यक्षस्थानी माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीतील अनुभव सांगितले. यावेळी जे.के. इन्स्टिट्यूटचे संस्थापक कल्याणराव जाधव, विनोद जाधव, उदयसिंह जाधव, एम. एस. जाधव, सृष्टी ससे आदींनी विचार मांडले. सूत्रसंचालन प्रा. तानाजी डोंडे यांनी केले. प्रास्ताविक निलेश जगताप यांनी केले, स्वागत पोपटराव सस्ते यांनी आभार महमद शेख यांनी मानले. साकुर्डेकर ग्रामस्थांनी नवनिर्वाचित आमदार हर्षदा जाधव व त्यांचे पती विनोद जाधव यांची घोड्यावरून मिरवणूक काढली.

नगरसेवक टिंगरे यांच्या पुढाकाराला यश

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे कराराचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासह भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टीने नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य मा. सुहास विजय टिंगरे यांनी पुढाकार घेतला होता. त्यांनी सूचक म्हणून मांडलेला आणि स्थायी समितीत यापूर्वी मंजूर झालेला महत्त्वपूर्ण ठराव आज पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेत (सर्वसाधारण सभेत) मंजूर करण्यात आला.

सुहास विजय टिंगरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वपूर्ण विषयाला आता मुख्य सभेचीही मंजुरी मिळाली असून, पुणे कराराच्या ऐतिहासिक स्मृती जतन करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे.

पुणे करार हा भारतीय सामाजिक आणि राजकीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या ऐतिहासिक घटनेच्या माध्यमातून सामाजिक समता, प्रतिनिधित्व आणि वंचित घटकांच्या हक्कांच्या प्रश्नांना महत्त्व प्राप्त झाले. या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व आणि त्यामागील विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने पुणे कराराच्या स्मृतींचे जतन करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने नगरसेवक सुहास विजय टिंगरे यांनी पुणे कराराचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या दृष्टीने हा ठराव मांडला होता. या प्रस्तावाच्या माध्यमातून पुणे कराराच्या ऐतिहासिक महत्त्वाचे जतन करणे, स्मारक व संग्रहालयाच्या संकल्पनेला चालना देणे, ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन करणे तसेच नव्या पिढीला या ऐतिहासिक घटनेची माहिती उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सुहास विजय टिंगरे यांनी सूचक म्हणून मांडलेल्या या ठरावाला प्रथम स्थायी समितीची आणि आज पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेची मंजुरी मिळाली आहे. पुणे शहराचा ऐतिहासिक वारसा जतन करणे, महापुरुषांच्या विचारांचा सन्मान करणे आणि सामाजिक समतेचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने सुहास विजय टिंगरे यांनी घेतलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची शिकवण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरेल.

स्वत:ची किडनी दान करून दिले नवे जीवन!

- भाऊबीजेला बहिणीची भावाला अनमोल भेट
- लहान बहिणीचा मोठा त्याग! दहा वर्षांपूर्वी भावासाठी अवयवदान
- आजही सहाही भावंडे कृतज्ञतेने साजरी करतात भाऊबीज



आंबेगाव (सदानंद शेवाळे) (दै. आरंभ पर्व)

भाऊबीज म्हटले की बहिणीचे औक्षण, भावाकडून मिळणारी ओवाळणी आणि बहीण-भावाच्या प्रेमाचे अतूट नाते डोळ्यांसमोर येते. मात्र, आंबेगाव तालुक्यातील लोणी येथील नाईक कुटुंबाने या नात्याला त्याग आणि माणुसकीचा एक अनोखा अर्थ दिला आहे. दोन्ही किडन्या निकामी झालेल्या भावाला स्वतःची किडनी दान करून धाकट्या बहिणीने नवे जीवन दिले. विशेष म्हणजे, या घटनेला दहा वर्षे पूर्ण झाली असून आजही हे संपूर्ण कुटुंब भाऊबीज हा सण कृतज्ञता आणि आनंदाच्या भावनेने साजरा करते. लोणी येथील सरपंच सावळेराम नाईक यांच्या दोन्ही किडन्या २०१६ मध्ये आजारपणामुळे निकामी झाल्याचे निदान झाले. घरातील कर्ता पुरुष अचानक गंभीर आजारी पडल्याने कुटुंबावर संकट कोसळले. अशा कठीण प्रसंगी भावाचे प्राण वाचवण्यासाठी त्यांच्या चार बहिणी आणि भावानेही आपली किडनी दान करण्याची तयारी दर्शवली. पाचही भावंडांचे रक्तगट जुळत असतानाच धाकट्या बहीण कांचनगंगा चंद्रकांत म्हसकुले यांनी पुढाकार घेतला. अवघ्या ४० व्या वर्षी त्यांनी आपल्या भावासाठी डावी किडनी दान करण्याचा धाडसी निर्णय घेतला. स्वतःच्या आरोग्याचा विचार करण्यापेक्षा भावाला जीवनदान देणे महत्त्वाचे मानत त्यांनी अवयवदान केले. त्यांच्या या निर्णयामुळे सावळेराम नाईक यांना जीवनदान मिळाले.

या शस्त्रक्रियेला आता दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. विशेष आनंदाची बाब म्हणजे बहीण आणि भाऊ दोघेही आज निरोगी व आनंदी जीवन जगत आहेत. गेल्या दहा वर्षांपासून भाऊबीजेच्या निमित्ताने सर्व सहाही भावंडे एकत्र येऊन हा दिवस अत्यंत वेगळ्या आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करतात. भाऊबीजेला बहिणीने भावाला ओवाळणी देण्याची परंपरा आहे. मात्र, कांचनगंगा यांनी आपल्या भावाला केवळ भेटवस्तू न देता आयुष्याची अनमोल भेट दिली. बहीण-भावाच्या नात्यातील प्रेम, विश्वास, त्याग आणि माणुसकीचे दर्शन घडवणारी ही घटना समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना सावळेराम नाईक म्हणाले, "कांचनगंगासारखी बहीण मला मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. तिच्या या निर्णयामुळे आमच्या बहीण-भावाच्या नात्याची वीण आणखी घट्ट झाली आहे. माझ्या ताईचे उपकार मी आयुष्यभर विसरू शकणार नाही."

भाऊबीजेच्या औक्षणापलीकडे जाऊन अवयवदानातून भावाला आयुष्याची भेट देणाऱ्या कांचनगंगा म्हसकुले यांचा त्याग खऱ्या अर्थाने बहीण-भावाच्या नात्याचा गौरव करणारा आहे. रक्ताच्या नात्यापेक्षाही प्रेमाचे नाते किती मोठे असते, याची जाणीव करून देणारी नाईक कुटुंबाची ही कहाणी समाजासमोर माणुसकीचा आदर्श ठेवणारी आहे.

अनाथ मुलांसमवेत दिवाळी साजरी



राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील यांनी पिंपरी बुद्रुक (ता. खेड) येथील निर्मल बाल विकास संस्थेतील अनाथ विद्यार्थ्यांसमवेत दिवाळी साजरी करून त्यांच्याबरोबर आनंदाचे क्षण अनुभवले. यावेळी त्यांनी मुलांना दिवाळी फराळाचे वाटप करून सणाचा आनंद द्विगुणित केला. या प्रसंगी तालुकाध्यक्ष विजया शिंदे, कार्याध्यक्ष सारिका कड, राजगुरुनगर शहराध्यक्ष अलका जोगदंड, निर्मल बाल विकास संस्थेच्या संचालिका गीता सावंत व सहव्यवस्थापक प्रियांका गायकवाड उपस्थित होत्या. संस्थेतील विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण करून यावेळी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना ॲड. राजमाला बुट्टे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीचा संपूर्ण शैक्षणिक खर्च उचलण्याची घोषणा केली. याशिवाय संस्थेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. या संस्थेने तुम्हाला घडविले आहे, त्यांचे ऋण कधी विसरु नका. ह्या भूमीचे भाग्यविधाते तुमच्यातून घडो ह्या भावना त्यानी व्यक्त केल्या. संस्थेच्या संचालिका गीता सावंत यांनी सर्वांचे स्वागत करून आभार मानले.

इनफिनिट इलेक्ट्रॉनिक्सचे पुण्यात जागतिक क्षमता केंद्र सुरू

पुणे (दै. आरंभ पर्व)

जागतिक स्तरावर विशेषीकृत कनेक्टिव्हिटी सोल्यूशन्सची निर्मिती करणाऱ्या इनफिनिट इलेक्ट्रॉनिक्सने पुण्यात आपल्या जागतिक क्षमता केंद्राचे (ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर – जीसीसी) उद्घाटन केले आहे. कंपनीच्या जागतिक कामकाजाचा एकात्मिक विस्तार म्हणून या केंद्राची उभारणी करण्यात आली असून, कंपनीच्या आगामी विकासाला गती देणे, कार्यक्षमता वाढविणे आणि जागतिक व्यवसायासाठी नवीन क्षमता विकसित करणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे. १८ नोव्हेंबर रोजी पुण्यात आयोजित उद्घाटन सोहळ्यास कंपनीच्या वरिष्ठ जागतिक नेतृत्वाने उपस्थिती लावली. यामध्ये मुख्य परिचालन अधिकारी केन ब्रॅडली, मुख्य मनुष्यबळ अधिकारी शा फार्ले, व्हॅल्यू क्रिएशन ऑफिसचे वरिष्ठ उपाध्यक्ष जस्टिन बोराडेल आणि कॉर्पोरेट डेव्हलपमेंटचे वरिष्ठ उपाध्यक्ष मॅथियास नॉवेंग यांचा समावेश होता. या नव्या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ पारंपरिक सामायिक सेवा केंद्र म्हणून कार्य करणार नसून, कंपनीच्या जागतिक व्यवसायाच्या विकासात थेट योगदान देणारे केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. सामायिक क्षमता, प्रक्रिया आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध व्यावसायिक विभागांमध्ये समन्वय वाढविणे, कामकाजाचा वेग सुधारणे आणि कार्यात्मक कार्यक्षमता अधिक सक्षम करणे यावर भर दिला जाणार आहे.



- कंपनीच्या विकासाला मिळणार नवी गती
- पारंपरिक सेवा केंद्राच्या पलीकडे जाऊन जागतिक व्यवसायाला बळकटी देण्याचा प्रयत्न
- एआय, उत्पादन, पुरवठा साखळी आणि खरेदी क्षेत्रांवर विशेष लक्ष

इंदापुरात राजकीय खळबळ!

मतदार यादीतून नावे वगळण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांचे अर्ज?



- राहुल मखरे यांचा गंभीर आरोप; एसआयआर प्रक्रियेवरून नवा वाद
- तहसील कार्यालयात ३२ हजार कागदपत्रे उपलब्ध असल्याचा दावा; पत्रकार परिषदेत कथित फोन रेकॉर्डिंग ऐकवली, सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेवरून इंदापूर तालुक्यात राजकीय वातावरण तापले आहे. भारतीय जनता पक्षाच्या काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी फॉर्म क्रमांक ७ भरून निवडणूक शाखेकडे अर्ज दाखल केल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे प्रमुख राहुल मखरे यांनी केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली. राहुल मखरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंदापूर तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेकडे एसआयआर प्रक्रियेशी संबंधित सुमारे ३२ हजार कागदपत्रे उपलब्ध आहेत. यामध्ये फॉर्म क्रमांक ६, ७ आणि ८ तसेच जबाब व सुनावणीसंदर्भातील कागदपत्रांचा समावेश आहे. यापैकी काही कागदपत्रे आपण मिळवली असून, काही कथित फोन रेकॉर्डिंगही आपल्याकडे असल्याचा दावा त्यांनी केला. भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी इंदापूर शहरासह तालुक्यातील अनेक नागरिकांची नावे मतदार यादीतून कमी करण्यासाठी फॉर्म क्रमांक ७ भरल्याचा आरोप मखरे यांनी केला. संबंधित मतदार मयत झाले आहेत, स्थलांतरित झाले आहेत किंवा परगावी वास्तव्यास आहेत, अशी कारणे अर्जांमध्ये नमूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या अर्जांच्या आधारे निवडणूक शाखेकडून संबंधित नागरिकांना नोटिसा पाठविण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. काही नागरिकांनी नोटिसांसह आपल्याशी संपर्क साधून हा प्रकार निदर्शनास आणून दिल्याचे मखरे यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत त्यांनी काही कथित फोन रेकॉर्डिंगही उपस्थित पत्रकारांना ऐकवली. या प्रकरणातील संबंधित भाजप कार्यकर्त्यांशी संपर्क साधला असता, आपण असे अर्ज दाखल केले नसून केवळ कोऱ्या कागदांवर सह्या घेतल्या होत्या, असे त्यांनी सांगितल्याचा दावा मखरे यांनी केला. त्यामुळे संबंधित अर्ज कोणी तयार केले, नागरिकांच्या सह्या कोणत्या उद्देशाने घेण्यात आल्या आणि मतदारांची नावे वगळण्यामागे नेमका हेतू काय होता, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भाजप संविधानाच्या समर्थनार्थ मोर्चे काढते; मात्र दुसरीकडे नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर गदा आणण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप राहुल मखरे यांनी केला. हा प्रश्न केवळ इंदापूरपुरता मर्यादित नसून लोकशाही व्यवस्थेतील मतदारांच्या अधिकारांशी संबंधित आहे. एसआयआर प्रक्रियेचा वापर करून विशिष्ट विचारांच्या मतदारांची नावे वगळण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. तहसीलदार जीवन बनसोडे यांनी संबंधित अर्जांवर विचार करून नागरिकांची नावे मतदार यादीतून कमी करण्यास विरोध केला असावा आणि त्यामुळे काही भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली असावी, अशी शक्यता मखरे यांनी व्यक्त केली. याच पार्श्वभूमीवर २५ नोव्हेंबर रोजी तहसीलदारांविरोधात मोर्चा काढण्यात येत असण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली.

थोडक्यात पण महत्वाचे



महंती प्रतिष्ठा व अमृत महोत्सव उत्साहात

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : मानव पंथातील एक ऐतिहासिक आणि भव्य दिव्य सोहळा पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर येथे मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा झाला. सप्तविध कार्यक्रमांतर्गत आयोजित या सोहळ्याला आचार्य गण, संत-महंत आणि पुणे जिल्ह्यातील शेकडो सद्भक्त मंडळी उपस्थित होती. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ४३ वा वर्धापन दिन, पंचावतार उपहार, दीक्षाविधी, महंती प्रतिष्ठा आणि अमृत महोत्सव. महंती प्रतिष्ठा : गुरुपरंपरेचा मानाचा सोहळा. कवीश्वर कुलांतर्गत नागराज कुळातील दत्तराज पंजाबी यांची शिष्य गादी कृष्णराज बाबा पंजाबी ही माहिती प्रतिष्ठान श्री महेंद्र मुनी पंजाबी यांना पंतपरंपरेने, सिंहासनावर बसून पाद प्रशाळा करून पंजाबी कुळातील शिष्य मान्यतेने आणि गुरुप्रसन्नतीने प्रदान करण्यात आली. यावेळी (श्री महेंद्र मुनी पंजाबी) यांना महंती प्रदान करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित संतांनी त्यांच्याकडून परमार्गाची तथा धर्माची अखंड सेवा घडत राहो, अशी शुभकामना दिली. पंजाबी कुळाचे धन - देवपूजा, प्रसाद व परंपरा यांचे संरक्षण करण्याची सेवा प्राप्त झाल्याबद्दल सर्वांनी त्यांचे विशेष आभार मानले व अभिनंदन केले. आचार्य श्री कृष्णा बाबाजी पंजाबी यांचा अमृत महोत्सव व ग्रंथ तुला रात्रीच्या सत्रात आचार्य श्री कृष्णा बाबाजी पंजाबी यांची साहित्य दृष्टी पाहून त्यांची ग्रंथ तुला करण्यात आली. त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. अनेक संत, महंत आणि भक्तांनी त्यांना शुभेच्छा देऊन त्यांच्या दीर्घायुष्यासाठी व धर्मसेवेसाठी प्रार्थना केली. सप्तविध कार्यक्रमाने भारावले वातावरण दिवसभर चाललेल्या सप्तविध कार्यक्रमात पंचावतार उपहार, दीक्षाविधी, प्रवचन, भजन, महाप्रसाद अशा विविध धार्मिक विधींनी वातावरण भक्तिमय झाले होते. शिक्रापूर नगरी मानव पंथाच्या जयघोषाने दुमदुमून गेली. शेवटी सर्व उपस्थित संत-महंतांनी या भव्य दिव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. मानव पंथाचा हा सोहळा परंपरा, श्रद्धा आणि गुरुभक्तीचे उत्तम दर्शन घडवणारा ठरला.

‘युवा स्मार्ट टर्म’ या नवीन जीवन विमा योजनेचा शुभारंभ

मुंबई (आरंभ पर्व) : स्टार युनियन दाई-इची लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाइफ) ने ‘एसयूडी लाइफ युवा स्मार्ट टर्म’ या शुद्ध मुदतीच्या जीवन विमा योजनेचा शुभारंभ जाहीर केला आहे. कुटुंबाला आर्थिक संरक्षण देऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी ही योजना तयार करण्यात आली असून, वाढत्या जबाबदाऱ्यांनुसार विमा संरक्षणाची रक्कम वाढवण्याचा पर्यायही यामध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. वाढत्या वयानुसार व्यक्तीच्या आर्थिक जबाबदाऱ्यांमध्येही बदल होत असतात. विवाह, अपत्यांचा जन्म, गृहकर्ज किंवा मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेले कर्ज यांमुळे कुटुंबाच्या आर्थिक गरजा वाढतात. अशा परिस्थितीत कुटुंबातील कमावत्या व्यक्तीच्या अनुपस्थितीत आवश्यक असणारे आर्थिक संरक्षण लक्षात घेता, आयुष्याच्या एका टप्प्यावर घेतलेले विमा संरक्षण पुढील टप्प्यावर अपुरे ठरू शकते. ही गरज लक्षात घेऊन एसयूडी लाइफ युवा स्मार्ट टर्ममध्ये ‘लाइफ स्टेज अपग्रेड’चा पर्याय देण्यात आला आहे. याअंतर्गत पात्र पॉलिसीधारकांना अशा महत्त्वाच्या जीवनघटनांनंतर नवीन पॉलिसी न घेता विद्यमान विमा संरक्षणाची रक्कम वाढवता येते.

धुक्याची आर्थिक किंमत : जेव्हा प्रत्येक श्वासासाठी किंमत मोजावी लागते

मुंबई (आरंभ पर्व) : दिल्ली-एनसीआरला वेढलेल्या तीव्र धुक्यापासून उत्तर आणि पश्चिम भारतातील शहरांमधील खालावलेल्या हवेच्या गुणवत्तेपर्यंत वायू प्रदूषण आता केवळ काही महानगर किंवा वर्षाच्या काही महिन्यांपुरते मर्यादित राहिलेले नाही. ४ नोव्हेंबर रोजी दिल्लीचा सरासरी एअर क्वॉलिटी इंडेक्स (एक्यूआय) ३७७ नोंदवला गेला, जो ‘अतिशय खराब' श्रेणीत येतो, तर मुंबईत ९१ आणि बेंगळुरूमध्ये ६९ एक्यूआय नोंदवला गेला, जे दोन्ही ‘समाधानकारक' श्रेणीत आहेत. या शहरांमधील हवेच्या गुणवत्तेतील ही तफावत वायू प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्येक शहराच्या गरजेनुसार सातत्यपूर्ण कृती करण्याची आवश्यकता अधोरेखित करते. कमी उत्पन्न असलेल्या शहरी वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लाखो लोकांसाठी प्रदूषित हवा ही केवळ ऋतुमानानुसार येणारी गैरसोय नसून त्यांच्या रोजच्या कामातील गंभीर धोका आहे. बांधकाम कामगार, फेरीवाले आणि स्वच्छता कामगारांना अत्यंत प्रदूषित वातावरणात काम करण्याशिवाय अनेकदा दुसरा पर्याय नसतो. जे लोक घरात किंवा कार्यालयात राहून काम करू शकतात किंवा एअर प्युरिफायर खरेदी करू शकतात, त्यांच्या तुलनेत या कष्टकरी वर्गाकडे प्रदूषणाचा संपर्क कमी करण्यासाठी अत्यंत मर्यादित साधने आहेत.



फर्ग्युसन रस्त्यावर अतिक्रमण रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना

पुणे (आरंभ पर्व) : गोपाळकृष्ण गोखले (फर्ग्युसन कॉलेज) रस्त्यावरील अतिक्रमणांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी पुणे महापालिकेने आता पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पदपथांवर झालेले अनधिकृत व्यवसाय, रस्त्यालगत वाढविण्यात आलेली दुकाने आणि त्यामुळे पादचाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन महापालिकेने या परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम हाती घेतली आहे. मात्र, केवळ एक दिवस कारवाई करून उपयोग नाही, तर पुन्हा अतिक्रमणे होणारच नाहीत, अशी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करा, अशा स्पष्ट सूचना महापालिकेचे सभागृहनेते गणेश बिडकर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील वाढत्या अतिक्रमणांबाबत स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. त्यानंतर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने काल या परिसरात मोठी कारवाई केली. या कारवाईनंतर आज सभागृह नेते गणेश बिडकर यांनी अतिक्रमण विभागातील अधिकारी आणि स्थानिक नगरसेवकांसमवेत रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कारवाईचा आढावा घेतला तसेच भविष्यात पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत, यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा केली.

साखळी चोरांना धैर्याने प्रतिकार करणाऱ्या सायलीचा आदर्श सर्वांनी घ्यावा!

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडून सायली घाडगे यांचे कौतुक; क्रिएटिव्ह फाउंडेशनतर्फे सन्मान

- मुलींच्या स्वसंरक्षणासाठी शालेय स्तरावर उपक्रम राबविण्याची संदीप खर्डेकर यांची मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

साखळी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्यांना धैर्याने प्रतिकार करून नागरिकांच्या मदतीने पकडून देणाऱ्या सायली घाडगे यांचा केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सायलीसारख्या धाडसी तरुणी दुर्जनांविरुद्ध निर्भयपणे लढतात, ही कौतुकास्पद बाब असून त्यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा. तिचे धाडस हे स्त्रीशक्तीचे प्रतीक असल्याचे गौरवोद्गार मोहोळ यांनी काढले. क्रिएटिव्ह फाउंडेशनतर्फे आयोजित या सत्कार सोहळ्याला सायली घाडगे, त्यांचे वडील प्रमोद घाडगे, फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर, नगरसेविका व फाउंडेशनच्या विश्वस्त मंजुश्री खर्डेकर, भरत मित्र मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब दाभेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

रविवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास सायली घाडगे ब्ल्यू नाईल हॉटेल ते कौन्सिल हॉल या रस्त्यावरून पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांना गाठले. त्यापैकी एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी हिसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र, सायली यांनी न घाबरता संबंधित चोरट्याचा हात घट्ट पकडून आरडाओरडा करण्यास सुरुवात केली.

चोरट्याने त्यांचे तोंड दाबण्याचा प्रयत्न केला असता सायली यांनी त्याला लाथ मारून प्रतिकार केला. दुचाकीवरील अन्य दोघांनीही त्यांच्या अंगावर जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी धैर्याने प्रतिकार सुरू ठेवत मदतीसाठी आवाज दिला. हा प्रकार पाहून परिसरातील नागरिक धावून आले. त्यांच्या मदतीने सायली यांनी तिन्ही संशयितांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

सायली या व्यवसायाने वास्तुविशारद (आर्किटेक्ट) आहेत. अशा धाडसी तरुणीचा सन्मान करताना क्रिएटिव्ह फाउंडेशनला मनस्वी आनंद होत असल्याचे अध्यक्ष संदीप खर्डेकर यांनी सांगितले.

यावेळी मुलींना शालेय स्तरापासूनच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचे खर्डेकर यांनी अधोरेखित केले. नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांनी यासाठी पुढाकार घेऊन पहिल्या टप्प्यात पुणे महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा उपक्रम राबवावा, अशी मागणीही त्यांनी केली.

या सत्कार सोहळ्यात सायली घाडगे यांना शाल, शक्तीचे प्रतीक असलेली दुर्गामातेची प्रतिमा आणि वीर हनुमानाची प्रतिमा भेट देऊन गौरविण्यात आले.

संकटाच्या क्षणी न घाबरता दाखवलेले धैर्य, प्रसंगावधान आणि नागरिकांच्या सहकार्याने केलेला प्रतिकार यामुळे सायली घाडगे यांची घटना महिलांच्या सुरक्षिततेबरोबरच स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली आहे.

हॅवेल्सकडून पहिला सुपर हाय-स्पीड बीएलडीसी प्लस फॅन सादर



नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

भारतीय फॅन उद्योगात नाविन्यपूर्ण उत्पादने सादर करण्याचा वारसा पुढे नेत हॅवेल्स इंडिया लिमिटेडने सीलिंग फॅन्सची नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. कार्यक्षमता, ऊर्जा बचत, स्मार्ट तंत्रज्ञान आणि आराम यांचा उत्तम समन्वय साधणाऱ्या या श्रेणीमध्ये भारतातील पहिला 'सुपर हाय-स्पीड बीएलडीसी प्लस फॅन', डयुअल कंट्रोल सुविधेसह 'सायलेंट एअर मॅक्स बीएलडीसी प्लस ' फॅन आणि भारतातील पहिला 'एजंटिक AI फॅन' यांचा समावेश आहे. घरगुती विद्युत उपकरणांच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण बदल घडवण्याच्या कंपनीच्या प्रयत्नांमधील हा महत्त्वाचा टप्पा आहे. गेल्या अनेक दशकांपासून भारतीय सीलिंग फॅन बाजारपेठेत प्रामुख्याने इंडक्शन फॅन्सचे वर्चस्व राहिले आहे. अधिक वीज वापरूनही उच्च गती आणि दमदार हवेमुळे हे फॅन्स लोकप्रिय होते. दुसरीकडे, बीएलडीसी फॅन्स ऊर्जा कार्यक्षमता आणि स्मार्ट वैशिष्ट्यांमुळे ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहेत. मात्र, या फॅन्सचा वेग आणि हवा देण्याची क्षमता तुलनेने कमी असल्याचा समज ग्राहकांमध्ये होता. ही मर्यादा दूर करण्यासाठी हॅवेल्सने बीएलडीसी तंत्रज्ञानामध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. उच्च गती आणि ऊर्जा कार्यक्षमता यांचा समतोल साधणारी नवीन उत्पादने कंपनीने विकसित केली आहेत. या नवीन श्रेणीतील प्रमुख उत्पादन म्हणजे भारतातील पहिला 'सुपर हाय-स्पीड बीएलडीसी प्लस फॅन'. पारंपरिक बीएलडीसी फॅन्सच्या तुलनेत अधिक प्रभावी कामगिरी देणाऱ्या या फॅनमध्ये उद्योगातील पहिला सुपर हाय-स्पीड सहावा स्तर (३८५ RPM) आणि अल्ट्रा बूस्ट सातवा स्तर (४०० RPM) देण्यात आला आहे.

फ्लिपकार्टच्या साथीने महिला उद्योजिकांचा प्रगतीचा नवा प्रवास



महिला उद्योजकता दिनानिमित्त त्यांचा प्रवास, त्यांचा दृढनिश्चय आणि भारताच्या उद्योजकतेच्या भविष्यात महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसायांचे वाढते योगदान अधोरेखित करतो.
- मुक्ता माथूर, बाप्पा असोसिएट्स, महाराष्ट्र

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतातील नोंदणीकृत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपैकी सुमारे दहापैकी चार उद्योग आता महिलांच्या मालकीचे आहेत. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या (पीआयबी) आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२६ पर्यंत ही संख्या सुमारे ३.६९ कोटी उद्योगांपर्यंत पोहोचली आहे. हे व्यवसाय रोजगार निर्माण करतात, स्थानिक पुरवठा साखळी मजबूत करतात आणि आर्थिक वाढ अधिक ठिकाणी पोहोचवतात. महत्त्वाकांक्षा मोठी असली तरी व्यापक बाजारपेठांमध्ये प्रवेश, विश्वसनीय लॉजिस्टिक्स आणि व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी योग्य पाठिंबा हे एक मोठे परिवर्तन घडवणारे घटक ठरले आहेत. फ्लिपकार्ट देशभरातील टियर २ आणि टियर ३ शहरांसह महिला उद्योजकांना ग्राहकांशी जोडून ही दरी भरून काढण्यास मदत करत आहे. सुलभ ऑनबोर्डिंग, वेळेवर पेमेंट आणि विक्रेत्यांच्या पाठबळाद्वारे हे मार्केटप्लेस व्यवसायांना स्थानिक बाजारपेठांच्या पलीकडे विस्तार करण्यास सक्षम करते. 'द बिग बिलियन डेज' सारखे कार्यक्रम त्यांची पोहोच आणखी वाढवतात. त्यामुळे उदयोन्मुख आणि प्रस्थापित विक्रेत्यांसाठी संधींची दारे उघडतात. माजी शिक्षिका असलेल्या मुक्ता माथूर यांनी २०१५ मध्ये भारतातील ई-कॉमर्स अजून पाय रोवत असताना माफक गुंतवणुकीसह 'बाप्पा असोसिएट्स'ची सुरुवात केली. आता हा एक प्रस्थापित इलेक्ट्रॉनिक्स व्यवसाय आहे. कॅल्क्युलेटर आणि इतर उपकरणांसोबतच घड्याळे ही त्यांची प्रमुख श्रेणी आहे. त्या डिसेंबर २०१५ मध्ये फ्लिपकार्टचा भाग झाल्या आणि तेव्हापासून त्यांनी बाजारपेठेत मोठे बदल पाहिले आहेत. त्यांच्या मते परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता हाच मुख्य आधार राहिला आहे. “बदल अटळ आहे,” असे त्या म्हणतात. हाच दृष्टिकोन त्यांच्या सुमारे १७ जणांच्या टीमलाही आकार देतो. त्यातील अनेकजण सात ते नऊ वर्षांपासून त्यांच्यासोबत आहेत. सोपी लिस्टिंग, वेळेवर पेमेंट, समर्पित अकाउंट मॅनेजमेंट आणि उत्तम रिटर्न हाताळणी अशा महत्त्वाच्या सपोर्टकडे ती लक्ष वेधते. 'द बिग बिलियन डेज' दरम्यानची विक्री मागील वर्षापेक्षा अधिक चांगली झाली आहे. पश्चिम आणि दक्षिण भारतातील ग्राहकांसह ती आता बंगळूरुपासून सुरुवात करून कर्नाटकात प्रवेश करण्याची आणि नवीन उत्पादने व ब्रँड्स जोडण्याची योजना आखत आहे. त्यांनी सर्वप्रथम २०२३ मध्ये ऑफलाइन माध्यमांतून आणि आपल्या वेबसाइटद्वारे 'मन्स अँड मार्स' बाजारात आणले.

परंतु त्या एकट्या ते टिकवू शकल्या नाहीत आणि त्यांनी काम थांबवले. बाजाराचा अधिक स्पष्ट अंदाज आल्यावर त्यांनी जुलै २०२४ मध्ये भागीदारीत ते पुन्हा लाँच केले. सुरतच्या बाहेरील ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे आठ महिन्यांपूर्वी त्या फ्लिपकार्टचा भाग झाल्या. आत्मविश्वासाने ब्रँड तयार करण्यासाठी त्यांनी विक्रेत्यांच्या पाठिंब्याला आणि उत्पादनाची पद्धत व मार्केटिंगबाबत मार्गदर्शनाला श्रेय दिले.

पिंपरी शहरातील चौकाचौकांत मोकाट कुत्र्यांचे साम्राज्य

महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची नागरिकांची मागणी



पिंपरी-परमेश्वर वाव्हळ (दै. आरंभ पर्व)

पिंपरी शहरातील खराळवाडी, कामगारभवन, इंदिरा गांधी चौक, महापालिका भवन, अंथीया सोसायटी, बजरंगनगर, आत्मनगर, विठ्ठल रखुमाई मंदिर, एचए कॉलनी, हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ, हौसिंग सोसायटी गेट

सुमेध बौद्धविहार, अंतर्गत गल्लीबोळ तसेच पिंपरी शहरातील रहिवासी वस्त्यांमध्ये मोकाट कुत्र्यांच्या टोळक्यांचा वावर वाढल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी कुत्र्यांचे थवे बसलेले असतात. काही ठिकाणी दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांच्या मागे कुत्री धावत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, शाळा परिसर आणि रहिवासी भागांमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्यांवरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना या कुत्र्यांचा सामना करावा लागत आहे. दुचाकीस्वारांच्या वाहनांमागे कुत्री धावत असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून चालताना विशेष खबरदारी घ्यावी लागत आहे.

अनेकदा कुत्र्यांच्या टोळक्यांमध्ये अचानक भांडणे सुरू होतात. त्यांच्या भुंकण्यामुळे परिसरातील नागरिकांनाही त्रास सहन करावा लागतो. काही ठिकाणी पादचाऱ्यांच्या अंगावर धावून जाण्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिका प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे. महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण आणि आवश्यक नियंत्रणाची कार्यवाही नियमितपणे होणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्ष रस्त्यांवरील परिस्थिती पाहता या उपाययोजनांचा प्रभाव कितपत दिसून येतो, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिकेने विशेष मोहीम राबवावी. गर्दीच्या चौकांमध्ये आणि रहिवासी भागांमध्ये नियमित पाहणी करावी. कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण प्रभावीपणे करावे. तसेच नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

थोर क्रांतीकारक बिरसा मुंडा यांची जयंती साजरी



पिंपरी (दै. आरंभ पर्व)

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील त्यांच्या प्रतिमेस उपमहापौर शर्मिला बाबर तसेच विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी नगरसदस्य कृष्णा सुरकुले, माजी नगरसदस्या उषा मुंढे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, वाहनचालक संतोष खामकर, विद्युत विभागाचे विष्णु गवारे तसेच सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग परचंडराव,दत्तात्रय कोकाटे आदी उपस्थित होते. लहानपणापासूनच देशभक्तीची आवड असलेले थोर क्रांतिकारक बिरसा मुंडा यांनी इंग्रजांविरोधात बंड पुकारून, हजारो क्रांतिकारकांची फौज केली आणि केवळ तीर कामठासारख्या शस्त्रांनी त्यांनी दिलेला अनोखा लढा स्वातंत्र्यलढ्याच्या पुस्तकात सुवर्णाक्षरात लिहिण्यासारखा आहे, भावी पिढीने क्रांतिकारक बिरसा मुंडा यांचा प्रखर देशभक्तीचा आदर्श घ्यावा असे गौरवोद्गार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी बोलताना सांगितले.



जंक फूडला नकार, आरोग्याला होकार

पुणे -शिर्डी १८० किलोमीटरची इंडियन सायकलिंग क्लबची नववी शिर्डी वारी पूर्ण

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

जंक फूडच्या वाढत्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पिंपळे निलख येथील इंडियन सायकलिंग क्लबच्या चार सायकलस्वारांनी पुणे ते शिर्डी अशी तब्बल १८० किलोमीटरची सायकलवारी यशस्वीरीत्या पूर्ण केली. क्लबची ही नववी शिर्डी सायकलवारी असून, प्रवासादरम्यान विविध ठिकाणी नागरिकांशी संवाद साधत आरोग्यदायी आहाराचे महत्त्व पटवून देण्यात आले.

क्लबचे अध्यक्ष चंद्रकांत ववले, संतोष दरेकर, संदीप बोडके आणि प्रा. सुनील अडसुळे यांनी या सायकलवारीत सहभाग घेतला. शनिवारी दि. १४ नोव्हेंबर रोजी पहाटे पावणे चार वाजता जगताप डेअरी येथून या मोहिमेला सुरुवात झाली. राजगुरुनगर, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर आणि कोराळे मार्गे सायंकाळी ६ वाजता सायकलस्वार शिर्डीत पोहोचले.

शालेय विद्यार्थी आणि तरुणांमध्ये फास्ट फूड, जंक फूड खाण्याचे प्रमाण वाढत आहे. चव आणि सहज उपलब्धतेमुळे अशा पदार्थांकडे आकर्षण वाढत असले, तरी त्याचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर होणारे परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचा जीवनशैलीत समावेश व्हावा, या उद्देशाने ही जनजागृती मोहीम राबविण्यात आल्याचे प्रा. सुनील अडसुळे यांनी सांगितले. माऊली ते संगमनेर या प्रवासादरम्यान चढाचा रस्ता, जोराचा वारा आणि वाढते ऊन यांचा सामना करत सायकलस्वारांनी चंदनापुरीचा घाट पार केला. प्रतिकूल परिस्थितीतही एकमेकांना प्रोत्साहन देत त्यांनी प्रवास पूर्ण केला. नारायणगाव आणि कोराळे येथे स्थानिक नागरिकांशी संवाद साधून जंक फूडच्या दुष्परिणामांबाबत प्रबोधन करण्यात आले. शिर्डीत पोहोचल्यानंतर सायकलस्वारांनी श्री साईनाथ महाराजांचे दर्शन घेतले. साईबाबांच्या 'श्रद्धा आणि सबुरी' या शिकवणीतून प्रतिकूल परिस्थितीतही ध्येय गाठण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. आशुतोष देसले, संजय टिळेकर आणि संतोष इंगवले यांनी प्रवासादरम्यान सायकलस्वारांना आवश्यक सहकार्य केले. इंडियन सायकलिंग क्लबतर्फे दरवर्षी देशाच्या विविध भागांत सायकलवारी आयोजित करून सामाजिक आणि पर्यावरणविषयक संदेश दिले जातात. झाडे लावा, झाडे जगवा, बेटी बचाओ, बेटी पढाओ क्लबच्या सदस्यांनी पुणे-कन्याकुमारी, पुणे-गोवा, पुणे-अक्कलकोट, पुणे-त्र्यंबकेश्वर आणि अष्टविनायक अशा सायकलवारी पूर्ण केल्या आहेत. पुणे-शिर्डी वारी नऊ वेळा, तर पुणे-पंढरपूर वारी चार वेळा पूर्ण केली आहे. भविष्यातही सायकलवारीच्या माध्यमातून सामाजिक आणि पर्यावरणविषयक प्रबोधन सुरू ठेवण्याचा निर्धार क्लबच्या सदस्यांनी व्यक्त केला.

थोडक्यात पण महत्वाचे



बाळासाहेबांचा फोटो फाडल्याच्या निषेधार्थ पुण्यात ठाकरे गट आक्रमक

पुणे (आरंभ पर्व) : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील कथित आक्षेपार्ह मजकुराच्या निषेधासाठी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत पोस्टर फाडण्याच्या कृतीवरून आता राजकीय वाद निर्माण झाला आहे. या पत्रकार परिषदेदरम्यान शायना एन.सी. यांच्याकडून बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडला गेल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ पुण्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत आंदोलन केले. एकनाथ शिंदे आणि शायना एन.सी. यांचे पोस्टर फाडून ते मुठा नदीत विसर्जित करत ठाकरे गटाने निषेध नोंदवला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी मुंबईत सोनिया गांधी लिखित 'Belonging – A Journey of Love' या पुस्तकातील मजकुरावर आक्षेप घेत पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करणारा मजकूर असल्याचा आरोप शिंदे गटाकडून करण्यात आला. याच निषेधार्थ पत्रकार परिषदेत पुस्तकाच्या काही प्रती आणि त्यातील पाने फाडण्यात आली. यावेळी प्रवक्त्यांकडून पुस्तक फाडण्याची कृती सुरू असताना शायना एन.सी. यांच्याकडून बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो असलेले पान फाडल्याचा आरोप झाला. या प्रकारानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. शिवसेना ठाकरे गटाने या कृतीचा निषेध करत शिंदे गटाला लक्ष्य केले.

बाळासाहेबांचा फोटो फाडल्यावरून काँग्रेसचाही हल्लाबोल



पुणे (आरंभ पर्व) : काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या पुस्तकावर शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांकडून आक्षेप घेण्यात आला आहे. या पुस्तकात सावरकरांच्या संदर्भात आक्षेपार्ह उल्लेख असल्याचा दावा शिंदे गटाकडून करण्यात आला आहे. पत्रकार परिषद घेत शिंदे गटाच्या नेत्यांनी हे पुस्तक फाडले. हे पुस्तक फाडत असताना शायना एनसी यांच्याकडून माणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडताना चुकून स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा देखील एक फोटो फाडण्यात आला. यावरून आता शिवसेना ठाकरे गटाकडून संताप व्यक्त केला जाता आहे. याचसोबत काँग्रेसनेही या गोष्टीचा निषेध नोंदवला आहे. प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी म्हटले की, अमित शहा प्रस्थापित शिंदे सेनेच्या नेत्या शायना एनसी, ज्या या मूळ भाजपच्या आहेत हे सर्वांना माहीत आहे. त्यांनी आज त्या ठिकाणी सोनियाजींच्या पुस्तकाविषयी काही आक्षेप घेण्याच्या दृष्टीने जी पत्रकार परिषद घेतली, त्यामध्ये अत्यंत बेदरकारपणे, असंवेदनशीलपणे, अत्यंत निष्काळजी व बेपर्वाईने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडला. फोटो फाडला, त्याच्यानंतर जेव्हा लक्षात आले तेव्हा देखील हसतायत. म्हणजे ही तर अत्यंत शरमेची गोष्ट आहे. पुढे गोपाळ तिवारी म्हणाले की, त्या ठिकाणी जे काही बसलेले नेते आहेत हे पूर्वाश्रमीचे इतर पक्षातले आहेत आणि आज शिंदे सेनेमध्ये ते भारतीय जनता पक्षाचा अजेंडा पूर्ण करायला चालले आहेत, हे खेदाने सांगावे लागते. म्हणजे वंदनीय बाळासाहेब ठाकरेंच्या विषयी आदर असण्याऐवजी गांधी कुटुंबीयांविषयी द्वेष, मत्सर व्यक्त करण्याकरता त्या ठिकाणी निश्चितपणे गेलेले आहेत. अन्यथा असा अपराध घडला नसता.



पुण्यात ४ ते ६ डिसेंबरदरम्यान मराठी साहित्य संमेलन

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यात 4 ते 6 डिसेंबरदरम्यान तिसरे रोटरी मराठी साहित्य संमेलन होणार आहे. कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणाऱ्या संमेलनाचे उद्घाटन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होईल. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे संमेलनाध्यक्ष असतील. नंदन बिल्डकॉनचे अध्यक्ष श्यामकांत कोतकर स्वागताध्यक्ष आहेत. ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री सतीश आळेकर यांना रोटरी व्होकेशनल एक्सलन्स अॅवॉर्ड देण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजतर्फे संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रांतपाल नितीन ढमाले, क्लबचे अध्यक्ष केदार गोडबोले, कार्याध्यक्ष मधुमिता बर्वे, सहकार्याध्यक्ष मोहन चौबळ, मार्गदर्शक राजीव बर्वे आणि रोहन कोतकर यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. रोटरीच्या 20 क्लबचा आयोजनात सहभाग आहे. 4 डिसेंबरला दुपारी साडेचार वाजता ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होईल. सायंकाळी साडेपाच वाजता उद्घाटन होईल. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि महापौर मंजुषा नागपुरे उपस्थित राहतील. रात्री साडेआठ वाजता 'संगीत मत्स्यगंधा' नाटकाचा प्रयोग होईल. 5 डिसेंबरला पद्मश्री हृदयनाथ मंगेशकर यांची विशेष मुलाखत होईल. वाचन आणि लेखन संस्कृतीवरील परिसंवाद, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांचा सत्कार आणि मुलाखतही होईल. कवी सौमित्र अर्थात किशोर कदम यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होणार आहे. त्याच रात्री योगेश सोमण 'जयोस्तुते' हा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावरील सांगीतिक कार्यक्रम सादर करतील. 6 डिसेंबरला सतीश आळेकर यांना पुरस्कार देऊन त्यांची मुलाखत घेतली जाईल. 'अभिजात दर्जा मिळाला, पुढे काय?' आणि 'आजच्या काळात संतसाहित्याची आवश्यकता आहे का?' या विषयांवर परिसंवाद होतील. कथाकथनानंतर अभिनेते मकरंद अनासपुरे यांची मुलाखत होईल. केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत सायंकाळी साडेसहा वाजता संमेलनाचा समारोप होईल.

सुकवणी सोसायटी परिसर कचरामुक्त

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

संत तुकारामनगर-सुकवणी सोसायटी परिसरातील कचऱ्याच्या प्रश्नावर अखेर पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाला जाग आली आहे. खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील जागेवर मोशी कचरा डेपोतील टाकण्यात आलेला कचरा महापालिकेने अखेर उचलला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून दुर्गंधीचा सामना करणाऱ्या परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रश्नावर महापालिका आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनामध्ये जबाबदारीवरून सुरू असलेल्या टोलवाटोलवीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. यासंदर्भात पिंपरी चिंचवड युवा सेनेचे प्रमुख संतोष म्हात्रे यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. सुकवणी कॅम्पच्या मागील बाजूस खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मालकीच्या जागेवर महापालिका प्रशासनाने मोशी कचरा डेपोतील कचरा काही दिवसांसाठी टाकला होता. मात्र, ठरावीक कालावधीसाठी टाकण्यात आलेला हा कचरा अनेक दिवस तसाच पडून राहिल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली होती. कचऱ्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही त्रासदायक झाले होते. डासांचा प्रादुर्भाव आणि आरोग्याच्या समस्यांची भीती निर्माण झाली होती. मात्र, हा कचरा कोणाच्या हद्दीत येतो आणि तो उचलण्याची जबाबदारी कोणाची, यावरून महापालिका व कॅन्टोन्मेंट प्रशासनामध्ये टोलवाटोलवी सुरू होती. या प्रशासकीय वादाचा नाहक त्रास स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत होता. या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन



> याबाबत संतोष म्हात्रे म्हणाले, कचरा कोणाचा आणि कोणाच्या हद्दीत येतो, हा वाद महापालिका व कॅन्टोन्मेंट प्रशासनाने आपापसात सोडवावा. मात्र, या वादाची शिक्षा सर्वसामान्य नागरिकांना मिळता कामा नये. परिसरातील नागरिकांना अनेक दिवस दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागला. यासाठी आम्ही संबंधित अधिकारी, खासदार आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर महापालिकेने कचरा उचलल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

खासदार बारणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर महापालिकेने कचऱ्याबाबत कार्यवाही केली. मात्र, कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या जागेवरील कचऱ्याचा प्रश्न कायम असल्याने जवळच्या सुकवनी सोसायटीसह वल्लभनगर बसस्थानक परिसरात या कचऱ्याची दुर्गंधी येते असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

यासाठी त्यांनी खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे आरोग्य विभागाचे नासिर मुकादम यांची भेट घेतली. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेचे आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रदीप टेंगळ यांच्याकडेही हा प्रश्न मांडून तातडीने कचरा हटविण्याची मागणी केली. प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर महापालिका प्रशासनाने कचरा उचलल्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

पुण्यात मेफेड्रोन विक्रीसाठी आलेले दोघे अटकेत

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुण्यात मेफेड्रोन विक्रीसाठी आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने लष्कर भागातून अटक केली. त्यांच्याकडून 3 लाख 7 हजार रुपयांचे मेफेड्रोन आणि एकूण 4 लाख 77 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. परवेज जाफर शेख (वय 35, रा. मनीष पार्क, कोंढवा) आणि नबील नूरमोहम्मद शेख (वय 34, सध्या रा. साळुंखे विहार रस्ता, वानवडी; मूळ रा. लोणावळा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

परवेज आणि नबील हे लष्कर भागातील क्लोव्हर सेंटर परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकातील पोलीस कर्मचारी अमोल सरडे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी क्लोव्हर सेंटरजवळील गल्लीत सापळा लावून दोघांना पकडले. झडतीत त्यांच्याकडे 102 ग्रॅम मेफेड्रोन सापडले. पोलिसांनी दोन दुचाकी आणि तीन मोबाइलसह एकूण 4 लाख 77 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मेफेड्रोन ते कोणाला विकणार होते आणि ते कोणाकडून आणले, याचा तपास सुरू आहे. पोलीस उपायुक्त गौहर हसन आणि सहायक आयुक्त शंकर खटके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे, उपनिरीक्षक योगेश कोतकर, आशा भिंगारे, सहायक फौजदार विठ्ठल साळुंखे, अविनाश रेडके, तुषार साळुंके, अमोल सरडे, विशाल भिलारे, अतुल क्षीरसागर आणि अमरनाथ लोणकर या पथकात होते.

बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली

खडकी (दै. आरंभ पर्व)

खडकी शिवसेना शाखेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृति दिनानिमित्त खडकी येथील शिवसेना शाखेच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या कार्यातून स्वतंत्र ओळख निर्माण केली. मराठी माणसाच्या हक्कांसाठी आवाज उठविणे, मराठी अस्मिता, स्वाभिमान आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे यासाठी त्यांनी आपले



संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे, प्रभावी वक्तृत्वामुळे आणि संघटन कौशल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचे वेगळे स्थान निर्माण झाले. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव आजही अनेक शिवसैनिकांच्या मनात कायम आहे. या स्मृतिदिनानिमित्त खडकी शिवसेना शाखेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. शिवसेनाप्रमुखांनी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी दिलेला लढा, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत दाखविलेली भूमिका आणि शिवसैनिकांमध्ये निर्माण केलेली संघटनात्मक बांधिलकी यांचे स्मरण उपस्थितांनी केले.

कार्यक्रमास उपशहर प्रमुख प्रशांत राणे, विभाग प्रमुख हेमंत यादव, उपविभाग प्रमुख प्रकाश चौरे, पुणे शहर वाहतूक सेनेचे प्रमुख हाजी बद्रुद्दीन शेख, मिथुन गवळी, मॅथ्यू लाझरस, स्नेहल पृथ्वीराज, अशोक शिरसाठ, मोहन गवळी, नारायण निमल, संतोष पवार आदी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले. खडकी शिवसेना शाखेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमातून शिवसैनिकांनी आपल्या नेत्याप्रती असलेली श्रद्धा आणि आदर व्यक्त केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे स्मरण करीत कार्यक्रमाची सांगता झाली.

पुण्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवारचे आंदोलन

अजित पवार विमान अपघाताची चौकशी सीबीआय किंवा सीआयडीकडे देण्याची मागणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

अजितदादांच्या विमान अपघातप्रकरणी आमदार रोहितदादा पवार यांनी उपस्थित केलेल्या रास्त प्रश्नांना बगल देणाऱ्या आणि जनतेची दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी बुधवारी पुण्यातील ऐतिहासिक अलका टॉकीज चौक येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार, पुणे शहरच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले आणि या प्रकरणातील सत्य जनतेसमोर आणण्याची ठाम मागणी केली.

विमान कंपनीच्या मालकाची चौकशी: या अपघाताला जबाबदार असलेल्या संबंधित विमान कंपनीच्या मालकाची अद्याप



सखोल चौकशी का झाली नाही, याचा जाब विचारण्यात आला.

अपघाताला नऊ महिने उलटून गेल्यानंतरही अधिकृत चौकशी अहवाल अद्याप समोर का आला नाही, याबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणामागील सत्य बाहेर येण्यासाठी हा तपास तातडीने सीबीआय किंवा सीआयडीमार्फत निष्पक्षपणे करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी लावून धरण्यात आली. या आंदोलनात पुणे शहर युवक अध्यक्ष किशोर कांबळे, स्वातीताई पोकळे, अजिंक्य पालकर, सुनील माने, विक्रांत पाटील, रोहन पायगुडे, अमोल परदेशी, अमोल जाधव, ओम पोकळे, स्वप्निल जोशी, समीर पवार, अर्जुन गांजे, कुशल मोरे, सुनील चव्हाण, देवा चलवादी, चेतन भोईटे, मंगेश जाधव, साहील कांबळे, स्वप्नील तांबे, हर्षवर्धन दिघे यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि पुणेकर नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मावळच्या डी-मार्टमधून २० हजार लिटर खाद्यतेल जप्त

- **५० लाख २७ हजार ८९३ रुपयांचा साठा; नऊ नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत**

पुणे (दै. आरंभ पर्व)

राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेंतर्गत मावळ तालुक्यातील आंबी येथील अव्हेन्यू सुपरमार्ट्स लिमिटेड (डी-मार्ट) येथे तपासणी केली. कमी दर्जाचे आणि चुकीचे लेबल लावलेले असल्याचा संशय असलेले 20 हजार 85 लिटर खाद्यतेल जप्त करण्यात आले. या साठ्याची किंमत 50 लाख 27 हजार 893 रुपये आहे. अन्न प्रशासनाने खाद्यतेलाचे नऊ नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागाच्या सहआयुक्त प्रीती तिपरे आणि पुणे विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई झाली. मावळ तालुक्यातील मौजे आंबी येथील गट क्रमांक 113 मधील शेड क्रमांक 1 येथे तपासणी करण्यात आली. तपासणीत खाद्यतेल कमी दर्जाचे (सबस्टँडर्ड) आणि त्यावर दिशाभूल करणारे लेबल असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. जप्त साठ्यात आधारचे रिफाइंड सूर्यफूल तेल, फॉर्च्युनचे राइस ब्रॅन ऑइल, पतंजलीचे कच्ची घाणी मोहरी तेल आणि सफोलाचे कोल्ड प्रेस्ड मोहरी व शेंगदाणा तेल यांचा समावेश आहे. पुणे गुप्तवार्ता विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी बालाजी शिंदे यांनी कारवाईसाठी माहिती गोळा केली होती. सहाय्यक आयुक्त डी. एस. साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली अन्न सुरक्षा अधिकारी ए. बी. भिसे आणि एस. एस. हाके यांच्या पथकाने तपासणी केली.

लाखो रुपये खर्चून उभारलेल्या संविधान प्रस्तावना कोनशिलांची दुरवस्था

- **महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष!**
- **संविधान दिन तोंडावर; येरवडा, कळस, धानोरी, विश्रांतवाडीत अस्वच्छता आणि बंद विद्युत रोषणाई**
- **मनसे विद्यार्थी सेनेचे २४ तासांचे अल्टिमेटम; स्वच्छता, दुरुस्ती, रंगरंगोटी आणि सुशोभीकरणाची मागणी**

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना व्हावी, या उदात्त हेतूने लोकप्रतिनिधींच्या निधीतून लाखो रुपये खर्च करून येरवडा, कळस, धानोरी आणि विश्रांतवाडी परिसरातील महापालिका शाळा व शासकीय कार्यालयांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेच्या कोनशिला उभारण्यात आल्या आहेत. मात्र, आज याच कोनशिलांची दुरवस्था झाली असून, अनेक ठिकाणी अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग, बंद विद्युत दिवे आणि देखभालीचा अभाव दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा होणार असतानाही या कोनशिलांच्या देखभालीकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर मनविसेच्या वतीने येरवडा-वडगाव शेरी तसेच नगर-वाघोली या दोन्ही क्षेत्रीय कार्यालयांना निवेदन देण्यात आले आहे. संविधान दिनापूर्वी सर्व कोनशिलांची स्वच्छता, दुरुस्ती, रंगरंगोटी आणि विद्युत रोषणाई सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

२६ नोव्हेंबर हा भारतीय संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. संविधानाच्या उद्देशिकेतून व्यक्त होणारी लोकशाही मूल्ये आणि नागरिकांचे मूलभूत विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी या कोनशिला उभारण्यात आल्या आहेत. मात्र, संविधानाचा सन्मान आणि त्यातील मूल्यांची जपणूक करण्यासाठी उभारलेल्या स्मृतिचिन्हांचीच दुरवस्था होणे ही गंभीर बाब असल्याचे मनविसेने म्हटले आहे.

या कोनशिलांची तातडीने स्वच्छता करावी, आवश्यक ठिकाणी दुरुस्ती व रंगरंगोटी करावी, बंद विद्युत दिवे आणि रोषणाई सुरू करावी, तसेच परिसरात रोपे व फुलझाडे लावून सुशोभीकरण करावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

महापालिका प्रशासनाने पुढील २४ तासांत मागण्यांवर कार्यवाही सुरू न केल्यास महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विभागाध्यक्ष कुलदीप अशोक घोडके यांनी दिला आहे.

यावेळी निवेदन देताना मनविसेचे विभागाध्यक्ष कुलदीप घोडके, उपाध्यक्ष किरण मोरे, विशाल कांबळे आणि सचिव अनिकेत लोणारे उपस्थित होते.

संविधान दिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना महापालिका प्रशासन या मागण्यांची कितपत दखल घेते आणि येरवडा, कळस, धानोरी व विश्रांतवाडी परिसरातील संविधान प्रस्तावना कोनशिलांना स्वच्छ व सुस्थितीत आणण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

अनेक शाळांमधील कोनशिलांची दुरवस्था

मनविसेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता विविध शाळा आणि शासकीय कार्यालयांमधील संविधान प्रस्तावना कोनशिलांच्या देखभालीतील त्रुटी समोर आल्याचे सांगितले.

- विठ्ठलराव गाडगीळ शाळा : संविधान प्रस्तावना कोनशिलेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असून स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे.
- संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालय : संविधान कोनशिलेवरील विद्युत दिवे बंद असल्याने परिसरात अंधाराचे वातावरण आहे.
- के. भाऊसाहेब जाधव शाळा : कोनशिलेवरील दिवे बंद असून परिसराच्या स्वच्छतेकडेही दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
- स्व. यशवंतराव चव्हाण विद्यानिकेतन : संविधान प्रस्तावना कोनशिलेच्या समोर कचरा जाळला जात असल्याचे तसेच फुटपाथचे गट्टू आणून ठेवल्याने परिसराचे विद्रूपीकरण होत असल्याचे मनविसेने म्हटले आहे.
- येरवडा क्षेत्रीय कार्यालय : कार्यालयासमोरील संविधान प्रस्तावना कोनशिलेची दुरवस्था झाली असून देखभालीचा अभाव असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय कळस येथील सीताराम देवकर प्राथमिक शाळा, धानोरी येथील विजयराव टिंगरे शाळा, विश्रांतवाडी येथील नानासाहेब परुळेकर शाळा आणि फुलेनगर येथील व्ही. डी. घाटे शाळेतील संविधान प्रस्तावना कोनशिलांवरील विद्युत दिवे बंद असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
दैनिक आरंभपर्वमध्ये
बातमीदार होण्याची संधी!
पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.
अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या दैनिक आरंभपर्व या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.
पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...
दैनिक आरंभपर्व PRESS
नियुक्ती करावयाची ठिकाणे
पुणे शहर व उपनगरे :
कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.
जुन्नर तालुका – नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
आंबेगाव तालुका – भीमाशंकर, तळघर.
खेड तालुका – खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
शिरूर तालुका – शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.
हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.
दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.
बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.
इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.
मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.
मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.
इच्छुकांनी संपर्क साधावा
श्री. लक्ष्मण साबळे
८६०५२८४२७२
श्री. सोमनाथ सालुंके
८४४६७९९३८३
श्री. प्रतिक गंगणे
७२७६३१४१४२